रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २१५
www.ramprahar.com
◆ शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### राष्ट्रीय महामार्गाच्या टोलनाक्यांवर रोखीचे व्यवहार होणार बंद



**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्गांवरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांसाठी टोल नाक्यांवरील रोख व्यवहार पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला असून येत्या १ एप्रिलपासून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. नॅशनल हायवेज ऑथॉरिटी ऑफ इंडिया म्हणजेच एनएचएआय आता पूर्णपणे डिजिटल पेमेंटकडे वळणार आहे. टोल संकलनात पारदर्शकता आणणे आणि वाहतूक अधिक वेगवान करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने शुक्रवारी (दि. २०) प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार देशभरातील राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्यांवर १ एप्रिलपासून रोख रक्कम स्वीकारली जाणार नाही. या बदलामुळे आता वाहनधारकांना टोल भरण्यासाठी फक्त फास्टॅग किंवा युपीआय या डिजिटल पर्यायांचाच वापर करावा लागेल.

## अंतरंग

मुरूड पोलिसांकडून घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक/२
पालीत नेटवर्क नॉट रिचेबल; ग्राहक संतप्त/५
नागोठणे रिलायन्स येथील प्रकल्पग्रस्त लढ्याला यश/७

# रायगड कबड्डीपटूंची खाण -आमदार प्रशांत ठाकूर

## जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या मातीत रूजलेली कबड्डी राज्याचा श्वास असून रायगड जिल्हा कबड्डीपटूंची खाण आहे, असे प्रतिपादन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २०) उलवे नोड येथे केले.

गोरगरिबांचे आधारस्तंभ, दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्ताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर २० ते २२ फेब्रुवारीपर्यंत जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रमुख संयोजक म्हणून आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलजवळील रामशेठ ठाकूर मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेच्या उदघाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील, पनवेलच्या उपमहापौर प्रमिला पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा संयोजन समितीचे सचिव शरद कदम, शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे व सुर्यकांत ठाकूर, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सहकार्यवाह जे.जे. पाटील, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, भाजपचे माजी शहराध्यक्ष अनिल भगत, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, रविशेठ पाटील, पं.स. सदस्य वितेश पाटील, जिज्ञासा कोळी, माजी सदस्य रत्नप्रभा घरत, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, कबड्डी असोसिएशनचे जिल्हा उपाध्यक्ष हिराचंद्र पाटील, खजिनदार जगदीश पाटील, प्रथमेश पाटील, संजय मोकल, नरेश म्हात्रे, प्रफुल्ल पाटील, जनार्दन पाटील, अजिंक्य पाटील, वाहतूक सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रभुदास भोईर, न्हावे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, भार्गव ठाकूर, रविनाथ पाटील, जयवंत देशमुख, अनंता ठाकूर, अंकुश ठाकूर, योगिता भगत, मिनाक्षी पाटील, निलेश खारकर यांच्यासह सामाजिक, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर तसेच कबड्डीप्रेमी मोठ्या संख्यने उपस्थित होते.





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### खेळाडूंचा उत्तम प्रतिसाद

आगामी राज्यस्तरीय स्पर्धेच्या धर्तीवर रायगड जिल्ह्याचा संघ निवडण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १२८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ सहभागी झाले आहेत. यातून निवड झालेल्या खेळाडूंचा संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या स्पर्धेत रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने जवळपास १०० पंच कार्यरत असून सुसज्ज अशी चार क्रीडांगणे, मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, नाश्ता, भोजन तसेच इतर पूरक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री प्रतिमांचे पूजन झाले. त्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते क्रीडाध्वजाचे रोहण करण्यात झाले, तर आमदार महेश बालदी यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आमदार प्रशांत ठाकूर भाषणात पुढे म्हणाले की, रायगड जिल्ह्यात अनेक शिवछत्रपती पुरस्कार विजेते घडले आहेत. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून अधिकाधिक प्रतिभावंत खेळाडू घडत आहेत. काल शिवजयंतीनिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांना संपूर्ण जगाने अभिवादन केले. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. जिल्ह्याने कबड्डी खेळावर सातत्याने प्रेम केले आहे. पेण, अलिबाग व त्या परिसरातील भागात मोठ्या प्रमाणात हा खेळ खेळला जातो. पनवेलच्या भागात तेवढ्या प्रमाणात कबड्डी रूजली नसली तरी प्रो-कबड्डीच्या माध्यमातून पोहचली आहे. अटल सेतू या भागाला जोडलेला आहे. त्याचबरोबर नागरीकरणही वाढले आहे. त्यामुळे आगामी काळात खेळाडूंची संख्या वाढेल.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ज्येष्ठ खेळाडूंच्या योगदानाबद्दल आभार व्यक्त करून नवोदित खेळाडूंचे स्वागत करत यांच्यातून उद्याचे उत्तम खेळाडू नेतृत्व करणार आहेत, असे अधोरेखित केले. कबड्डी चळवळीला पाठिंबा देण्यासाठी ज्येष्ठ कबड्डीपटू कार्यरत असून त्यांच्या प्रेरणेने जिल्ह्यातून शिवछत्रपती पुरस्कार विजेते, अर्जुनवीर खेळाडू निर्माण होतील, अशी अपेक्षा व्यक्त करून या स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी दिल्याबद्दल त्यांनी कबड्डी असोसिएशनचे आभार मानले.

# कोत्या मनाच्या प्रवृत्तीकडून कधीही अपेक्षा बाळगू नये

## संदीप देशपांडेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबई महापालिका निवडणुकीसाठी १७ वर्षांनंतर एकत्र आलेल्या ठाकरे बंधूंच्या युतीला निवडणुकीच्या निकालानंतर पहिला मोठा तडा बसल्याचे चित्र आहे. मनसेने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कोट्यातून स्वीकृत नगरसेवकपदाची एक जागा मिळावी अशी मागणी केली असताना, उद्धव ठाकरे यांनी मात्र मनसेचा प्रस्ताव बाजूला सारून स्वतः च्या तीन नावांवर शिक्कामोर्तब केल्याची चर्चा आहे. यामुळे संतापलेल्या मनसे नेते संदीप देशपांडे यांनी उद्धव ठाकरेंचे नाव न घेता त्यांच्यावर 'कोत्या मनाची प्रवृत्ती' अशी टीका केली आहे.

मुंबई महापालिकेत एकूण १० स्वीकृत नगरसेवकांची निवड होणार आहे. संख्याबळानुसार उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला तीन जागा मिळणार आहेत. या तीनपैकी एक जागा आम्हाला मिळावी, असा आग्रह मनसेने धरला. मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी याबाबत प्रस्तावही दिला होता, मात्र उद्धव ठाकरे यांनी साईनाथ दुर्गे, माधुरी मांजरेकर आणि कैलास पाठक यांची नावे दिल्याचे म्हटले जात आहे.

उद्धव ठाकरेंच्या या निर्णयामुळे मनसे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. मनसेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांनी आपल्या व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसच्या माध्यमातून या वादाला फोडणी दिली. त्यांनी आपल्या स्टेटसमध्ये लिहिले की, कोत्या मनाच्या प्रवृत्तीकडून कधीही स्वीकृतीची अपेक्षा बाळगू नये. थेट नाव घेतले नसले तरी देशपांडे यांचा रोख उद्धव ठाकरे यांच्याकडेच असल्याचे स्पष्ट होत आहे.

# लाचखोर तहसीलदार ताब्यात

**परळी : प्रतिनिधी**

परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे लाच प्रकरणात अडकल्याची घटना समोर आली आहे. तक्रारदारास सालन्सी प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी पन्नास हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

या प्रकरणात तडजोडीअंती २० हजार रुपये देण्याचे ठरले, मात्र तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने तहसीलदार मुंडे यांना रंगेहाथ पकडण्यासाठी सापळा रचला होता, मात्र तक्रारदाराच्या हालचालीवर संशय आल्याने मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले. तरीही एसीबीने आवश्यक ते सर्व पुरावे संकलित करून तहसीलदारांना ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

## निवडक

### प्रसिद्ध चित्रपट निर्माते एम.एम. बेग यांचे निधन

**मुंबई** : ज्येष्ठ चित्रपट निर्माते एम.एम. बेग यांचे निधन झाले आहे. ते सुमारे ७० वर्षांचे होते. हिंदी चित्रपटांमधील काम आणि बालकलाकार बेबी गुड्डू हिचे वडील म्हणून प्रसिद्ध असलेले बेग हे घरात मृतावस्थेत आढळून आले. धक्कादायक बाब म्हणजे मृत्यूनंतर आठवडाभर त्यांचा मृतदेह घरातच पडून होता. अखेरीस दुर्गंध सुटल्याने शेजाऱ्यांना या घटनेची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आले.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार, त्रिकुटाला बेड्या

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात एका १५ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिला पाच दिवस जंगलात डांबून ठेवत लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. पीडिता कॉलेजला जाते सांगून घराबाहेर पडली होती. या प्रकरणाला 'लव्ह जिहाद'चा अँगल जोडला जात असून घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे.

# भिवंडी महापालिकेत बंडखोरी करणाऱ्यांवर कारवाई करणार -भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाण



**मुंबई : प्रतिनिधी**

भिवंडी महापालिकेत भाजपचे बंडखोर नारायण चौधरी यांनी काँग्रेसच्या पाठिंब्यावर महापौरपद मिळवले. महापौरपदाच्या निवडणुकीत झालेल्या बंडखोरीची भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गंभीर दखल घेतली असून या बंडखोरांवर कठोर कारवाई करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

भिवंडीत महापौरपदासाठी भाजपने सुरुवातीला नारायण चौधरी यांच्या नावाचा विचार केला होता, मात्र प्रदेश पातळीवरील चर्चेनंतर आणि बदललेल्या राजकीय समीकरणांनंतर स्नेहा पाटील यांना अधिकृत उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. चौधरी यांनी बंडखोरी करीत काँग्रेस आणि शरद पवार गटाचा पाठिंबा मिळवत महापौरपद मिळविले.

या सर्व घडामोडींवर प्रतिक्रिया देताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, महापौरपदाच्या उमेदवारीबाबत पक्षात चर्चा सुरू होती. स्नेहा पाटील यांचे नाव निश्चित झाल्यानंतर नारायण चौधरी आणि त्यांच्यासोबत असलेल्या नगरसेवकांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. बंडखोरी केल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांना दिला होता. त्यांनी बंडखोरी करणार नाही असे आश्वासन दिले होते, मात्र निकालातून त्यांनी बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेत सत्ता मिळवण्यासाठी थेट वैचारिक प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसशी हातमिळवणी केल्याने भाजप नेतृत्वाने हे प्रकरण गंभीरपणे घेतले आहे. ज्यांनी-ज्यांनी पक्षाच्या ध्येयधोरणांविरुद्ध जाऊन आणि आदेश धाब्यावर बसवून काम केले आहे, त्या सर्वांवर पक्ष नियमानुसार कडक कारवाई करेल, असा इशारा भाजप प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी यावेळी दिला.

# एआय समिटमध्ये महाराष्ट्राचा डंका!

## कृषी विकासासाठी महाॲग्री ठरणार गेमचेंजर -मुख्यमंत्री फडणवीस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



कृषी क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्न करीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. २०) येथे सांगितले. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर ही बाब केवळ प्रदर्शने आणि चर्चेपुरती मर्यादित न राहता ती मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहचण्याची गरजही मुख्यमंत्र्यांनी प्रतिपादित केली.

नवी दिल्लीतील भारत मंडपम् येथे सुरू असलेल्या इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-२०२६मधील एआय इन ॲग्रिकल्चर या विषयावरील चर्चासत्रात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या वेळी मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री नितेश राणे यांची उपस्थिती होती. या चर्चासत्रात मुख्य सचिव राजेशकुमार अगरवाल, केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाचे सचिव देवेश चतुर्वेदी, कृषी सचिव विकासचंद्र रस्तोगी, एम.एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सौम्या स्वामीनाथन, जागतिक बँकेच्या दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष जोहॅन्स झुट, एक्स्टेप फाउंडेशनचे सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शंकर मरुवाडा सहभागी झाले होते.

सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षिततेवर ताण आला आहे. अनिश्चित वातावरण, घसरणारी पाणी पातळी, जमिनीचा खालावणारा दर्जा, पुरवठा साखळीतील अडथळे आणि जागतिक मार्केटमधील अनिश्चितता यांचा या आव्हानांमध्ये समावेश आहे. अशा परिस्थितीत आर्टिफिशिअल इंटेलिजन्स महत्वाची भूमिका पार पाडू शकते, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जगातील अनेक देशांसाठी कृषी विषय केवळ आर्थिक विषयाशी निगडीत नाही. कृषी विषय अन्न सुरक्षितता, सामाजिक सुरक्षितता, आर्थिक स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. यामुळे भारताने याबाबत फार पूर्वीच विचार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या इंडिया एआय मिशनमध्ये कृषी क्षेत्राचा प्रामुख्याने विचार केला आहे. यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर, सेवापुरवठा, समावेशकता यांचा विचार केला गेला आहे.

भारतातील सुमारे निम्मी लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या कृषी क्षेत्राशी निगडीत आहे, पण यापैकी फार कमी लोकांना बदलते हवामान, शेतीसाठी आवश्यक असणारे निविष्ठाचे दर, शेतमालाचे बाजारभाव, वित्तपुरवठा याबाबत माहिती उपलब्ध आहे. सध्याच्या व्यवस्थेला गतीने माहिती पुरवण्यात आणि आवश्यक माहिती देण्यात काही मर्यादा आहेत. यावर आपण आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या सहाय्याने मात करू शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# दहावीची परीक्षा सुरू

### रायगडात ३७ हजार ५७९ परीक्षार्थी



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला शुक्रवार (दि २०) पासून सुरुवात झाली. १८ मार्चपर्यंत ही परीक्षा सुरू राहणार आहे. रायगड जिल्ह्यात ३७ हजार ५७९ दहावीचे परीक्षार्थी असून ७५ केंद्रांवर ही परीक्षा होत आहे.

परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. सर्व केंद्रांवर आवश्यक सोयीसुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि नियंत्रण यंत्रणा उभारण्यात आली आहे. परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात व्हावी याकरिता जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन आणि शिक्षण विभागाने समन्वयाने कठोर उपाययोजना आखल्या आहेत. परीक्षेदरम्यान कॉपी करताना आढळल्यास केवळ विद्यार्थ्यांवरच नव्हे, तर त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या पालकांवर आणि संबंधित शिक्षकांवरही गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

सर्व परीक्षा केंद्रांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ज्या वर्गखोल्यांमध्ये परीक्षा होणार आहे, त्या प्रत्येक खोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांचे फुटेज जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि शिक्षण विभागाकडून थेट मॉनिटर केले जाणार आहे. (पान २ वर..)

# उलवे नोडमध्ये रंगला 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा'

## बहारदार कार्यक्रमाला शिवप्रेमींची दाद

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून उलवे नोडमध्ये भव्य उत्सवाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. या उत्सवाचे मुख्य आकर्षण रामशेठ ठाकूर मैदान येथे द फोक आख्यान अंतर्गत झालेला महाराष्ट्राचा शाहिरी बाणा हा विशेष कार्यक्रम ठरला. सुप्रसिद्ध शाहीर चंद्रकांत माने आणि शाहिरा ऋतुजा माने यांनी आपल्या खणखणीत आवाजात आणि प्रभावी सादरीकरणातून शिवचरित्र, महाराष्ट्राचा देदीप्यमान इतिहास, मावळ्यांचा पराक्रम आणि मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती, गव्हाणच्या वतीने हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात पार पडला. या सोहळ्यास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेचे नगरसेवक अजय बहिरा, विकास घरत, सुमित झुंझारराव, नगरसेविका राजश्री वावेकर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, सागर ठाकूर, भार्गव ठाकूर, स्वप्नील ठाकूर, विश्वनाथ कोळी, सुधीर ठाकूर, सी.एल. ठाकूर, अनिल खोडपे, किशोर पाटील, सचिन घरत, योगिता भगत, निलेश खारकर, साईचरण म्हात्रे, ज्योत्स्ना ठाकूर, वंदना पाटील, उत्सव समितीचे अध्यक्ष वसंत पाटील, उपाध्यक्ष अशोक कडू, जयवंत देशमुख, खजिनदार गजानन घरत, राज ठाकूर, प्राप्ती ठाकूर, रोशन म्हात्रे, सायली वाडवळकर, कमलेश कुमार, बंटी घरत, अपूर्व ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

यावेळी शाहिरांच्या पोवाड्यांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले, तर इतिहासातील विविध प्रसंगांच्या जिवंत सादरीकरणामुळे मैदानावरील वातावरण शिवमय झाले होते. या सांस्कृतिक सोहळ्याला उलवे नोडसह परिसरातील असंख्य शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त दाद दिली. (पान २ वर..)

# एआयच्या माध्यमातून लोकशाही सशक्त करण्याची संधी : अ‍ॅड. आशिष शेलार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एआय ही केवळ तंत्रज्ञान क्रांती नसून ती लोकशाही अधिक सशक्त करण्याची संधी आहे. सुरक्षित आणि स्मार्ट शासनाची गरज लक्षात घेता महाराष्ट्राने एआयचा प्रशासनात प्रभावी वापर केला असल्याचे सांगून महाराष्ट्र या तंत्रज्ञान क्रांतीचे केंद्र बनले असल्याचा विश्वास राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी शुक्रवारी व्यक्त केला.



नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'महा एआय : बिल्डिंग सेफ, सिक्युअर अँड स्मार्ट गव्हर्नन्स' या सत्रात ते बोलत होते. यावेळी माहिती व तंत्रज्ञान सचिव वीरेंद्र सिंग उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासनाला मानवी चेहरा देण्याबरोबरच अधिक वेगवान, पारदर्शक केले असल्याचे सांगून शेलार यांनी महाराष्ट्र शासनाने केलेल्या डिजिटल प्रवासाची सविस्तर माहिती दिली. मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या 'महा क्राईम' प्रकल्पामुळे गुन्हेगारी रोखणे, तपास प्रक्रिया गतिमान करणे आणि पारदर्शकता वाढविणे शक्य झाले. या प्रणालीचे मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनीही कौतुक केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात महा आयटी एक प्रगत 'इंटेलिजेंट गव्हर्नमेंट इन्फ्रास्ट्रक्चर' उभारत असून हे क्लाउड-नेटिव्ह आणि एपीआय-आधारित मॉडेल आहे. या माध्यमातून स्मार्ट भरती प्रक्रिया, शहरी स्थानिक संस्थांसाठी एआय-आधारित मालमत्ता मॅपिंग,रिअल-टाइम नागरी डॅशबोर्ड,वाहतूक व पूर व्यवस्थापनासाठी तात्काळ डेटा विश्लेषण,हवामान आणि नागरी तक्रार निवारण प्रणाली हे उपक्रम राबविले जात असल्याचेही श्री शेलार यांनी यावेळी सांगितले. एआयचा वापर प्रशासनाला नागरिकांपासून दूर नेण्यासाठी नव्हे, तर अधिक संवेदनशील, अचूक आणि प्रतिसादक्षम करण्यासाठी केला जात असल्याचेही अ‍ॅड. शेलार यांनी स्पष्ट केले.

या सत्राच्या दुसऱ्या टप्प्यात मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रा प्रवीण परदेशी, महाराष्ट्र सायबर सेलचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव, डॉ. अनुपम चटोपाध्याय, रणजित गोस्वामी, सुरेश सेठी, डॉ अमित कपूर, बिना सरकार, देवरुप धर यांनी अनुभव मांडले.

# श्रीवर्धन नगर परिषदेकडून मोबाईल संपर्क उपक्रम

## दाखल्यांसाठीची दिरंगाई होणार कमी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील नागरिकांना विविध दाखले मिळवताना करावे लागणारे वारंवार हेलपाटे आणि कार्यालयीन दिरंगाई लक्षात घेऊन श्रीवर्धन नगरपरिषदेकडून नवा 'मोबाईल संपर्क' उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे अर्जातील त्रुटी, आवश्यक कागदपत्रांची कमतरता किंवा कर थकबाकी याबाबतची माहिती संबंधित नागरिकांना थेट भ्रमणध्वनीवर कळविण्यात येणार आहे.

नगरपरिषद कार्यालयात रहिवासी दाखला, ना हरकत प्रमाणपत्र आदींसाठी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज येत असतात. मात्र कागदपत्रे अपूर्ण असणे, संबंधित अधिकारी उपलब्ध नसणे किंवा कर बाकी असल्यामुळे अर्ज प्रलंबित राहतात. परिणामी नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जातो.नव्या योजनेनुसार अर्ज दाखल होताच त्याची अधिकृत नोंद केली जाईल. त्यानंतर अर्जात काही त्रुटी आढळल्यास किंवा अतिरिक्त कागदपत्रांची आवश्यकता असल्यास संबंधित व्यक्तीस तत्काळ फोन करून माहिती दिली जाईल. त्यामुळे अनावश्यक फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही.

यासोबतच आवश्यक कागदपत्रांची यादी कार्यालयात फलकावर लावण्यात येणार असून विविध विभागांचे संपर्क क्रमांकही जाहीर करणार आहेत.

**श्रीवर्धनमधील सत्तर टक्के जनता ही मजुरीवर उदरनिर्वाह करणारी आहे. त्यांच्या वेळेचे व श्रमांचे मोल आम्हाला ठाऊक आहे. त्यांचा दिवस वाया जाऊ नये यासाठी ही योजना राबवत आहोत. प्रत्येक अर्जदाराला त्याच्या कामाची स्थिती थेट भ्रमणध्वनीवरून कळवली जाईल. प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार व नागरिकाभिमुख करण्याचा हा प्रयत्न आहे. श्रीवर्धनकरांना तत्पर सेवा देणे हीच आमची प्राथमिकता आहे.**

**-अ‍ॅड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन**

## पालघरमध्ये अपघातात दोन महिलांचा मृत्यू

**पालघर : प्रतिनिधी**

राज्यात अपघाताचे सत्र सुरूच आहे. धुळ्यामध्ये अपघाताची घटना ताजी असताना पालघरमध्ये भीषण अपघाताची घटना घडली आहे. पालघरमध्ये भरधाव पिकअपने दोन महिलांना चिरडले. या अपघातात दोन्ही महिलांचा जागीच मृत्यू झाला. अपघातामुळे रस्त्यावर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पालघरमध्ये आठवडी बाजार आटपून घराकडे पायी निघालेल्या लता निलेश तरे (वय ४५) आणि बेबी चंद्रकांत जाधव (वय ६५) या दोन पादचारी महिलांना एका भरधाव पिकअपने चिरडल्याची धक्कादायक घटना घडली. या दुर्घटनेत दोन्ही महिलांचा जागीच मृत्यू झाला आहे. पालघर नंडोरे या मार्गावर हा भीषण अपघात घडला. पालघर पोलिसांनी पिकअप चालकाला ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

# मुरूड पोलिसांकडून घरफोडी करणाऱ्या आरोपीला अटक

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील वावडुंगी येथे राहणारे रामचंद्र सहदेव काते हे काही दिवसापूर्वी कामा निमित्ताने मुंबई येथे गेले होते.या नेमक्या संधीचा फायदा घेत आरोपी अल्तमश निसार शेणवी वय ३२ वर्षे, रा. पेठ मोहल्ला मुरुड याने या बंद घरात प्रवेश करून लाकडी कपाटात ठेवलेले ७५ ग्राम सोने व इतर असा एकूण १० लाख ५० हजार रुपयांचा येवज घेऊन पोबारा केला होता.सदरची तक्रार मुरुड पोलिस ठाण्यात दाखल होताच कर्तव्यदक्ष पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी तपास सुरू करून आरोपीला मुद्देमालासह अटक करून त्याच्यावर घर फोडीचा गुन्हा दाखल करण्यात यश मिळवले आहे.या बाबतचे सविस्तर वृत्त असे की,



सदर गुन्हयाच्या अनुषंगाने मुरुड पोलिसांना गोपनिय बातमीदारार्फत आरोपीत अल्तमश निसार शेणवी वय ३२ वर्षे, रा. पेठ मोहल्ला मुरुड यानी घरफोडी केल्याची पक्की खबर मिळाली.त्या अनुषंगाने या आरोपीस ताब्यात घेण्यात आले.त्याला ताब्यात घेत त्याची कसून चौकशी केली असता त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली देत चोरी करून नेलेले सोन्याचे दागिणे त्याच्या सासरी राजपुरी येथील घराचे पोटमाळ्यावर असलेल्या सुटकेसमध्ये लपवुन ठेवले असल्याची कबुली दिल्याने सदरचे दागिणे दोन सरकारी पंचाच्या समक्ष जप्त करून ताब्यात घेण्यात आले. अधिक तपास सुरू आहे.

# सावरोली-खारपाडा मार्गावर धोकादायक वळणावर गतिरोधक बसवण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

सावरोली खारपाडा राज्य मार्गावर खरसुंडी हद्दीत पावसाळी मोरीच बांधकाम करण्यात येत असून त्यासाठी मुख्य रस्ता बंद करून पर्यायी मार्ग तयार करण्यात आला आहे .परंतु या ठिकाणी अवघड वळण असल्याने काम सुरू असलेल्या ठिकाणी दोन्ही बाजूला गतिरोधक बसवण्याची मागणी होत आहे.



तालुक्यातील पाताळगंगा औद्योगिक वसाहत आणि ढेकू लघुउद्योग नगरी यांना जोडणारा महत्त्वाचा सावरोली खारपाडा राज्यमार्ग आहे. पेण, पनवेल, पाली आणि खालापूर या तालुक्यांना जोडणारा हा मुख्य रस्ता आहे. या मार्गावरून अवजड वाहतूक ,प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असते. एकेरी रस्ता तसेच अनेक ठिकाणी साईट पट्टी देखील नसल्याने अगोदरच हा रस्ता धोकादायक आहे. सध्या या राज्य मार्गावर पावसाळी पाणी वाहून नेणाऱ्या मोरीची उंची वाढवण्याचे काम सुरू आहे .जुनी मोरी काढून टाकून त्या ठिकाणी नवीन बांधकाम करण्यात येत आहे. त्यासाठी काम सुरू असलेल्या ठिकाणी मुख्य रस्ता बंद करून पर्यायी रस्ता तयार करण्यात आला आहे.

खरसुंडी गावाच्या हद्दीत सेंट मेरी शाळेच्या पुढे अवघड वळणावर काम सुरू असून त्या ठिकाणी देखील पर्याय रस्ता तयार करण्यात आला आहे. या मार्गावरील सर्वात धोकादायक वळण म्हणून हा पट्टा ओळखला जातो .या ठिकाणी समोरचे वाहन दृष्टिक्षेपात येत नसून नेहमी अपघात घडत असतात .त्यातच तयार करण्यात आलेला कच्चा पर्यायी रस्ता अधिकच वळणदार झाला असून अपघाताची दाट शक्यता आहे.

## विद्याभवनला 'ए प्लस' श्रेणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग अंतर्गत राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेद्वारे २०२५-२६ मध्ये केलेल्या बाह्य मूल्यांकनात विद्याभवन प्राथमिक मराठी आणि विद्याभवन प्राथमिक इंग्लिश या दोन्हीही शाळांना 'ए प्लस' मनांकन जाहीर करण्यात आले.

नवी मुंबईत ए प्लस श्रेणी मिळालेल्या तीन शाळांपैकी दोन शाळा विद्याभवन शिक्षण संकुलातील आहेत. विद्याभवन शिक्षण संकुलाने गेल्याच वर्षी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या शासकीय उपक्रमात ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचे अकरा लक्ष रुपयांचे पारितोषिक पटकावले. विद्याभवनच्या या रौप्य महोत्सवी वर्षात दोन शाळांना ए प्लस श्रेणी लाभण्यास विशेष महत्व आहे. नियोजन, शिस्त, दर्जेदार शैक्षणिक निकाल, विविध कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा यामध्ये संकुलाने केलेले कौतुकास्पद कार्य याचे फलित या मानांकनातून शाळेला मिळाला आहे, असे विचार समन्वयक पांडुरंग मुळीक यांनी यावेळी व्यक्त केले.

# रसायनी परिसरात ठिकठिकाणी शिवजयंती साजरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी-पाताळगंगा परिसरात शिवजयंती उत्सव मोठ्या थाटामाटात, उत्साहात साजरी करण्यात आली. रसायनी परिसरातील मोहोपाडा, रिस, चांभार्ली, वावेघर, कराडे,सावळे, आपटा, वाशिवली, गुळसुंदे, इसांबे, चावणे आदीसह परिसरातील ग्रामपंचायत कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. यावेळी शिवभक्तांनी ठिकठिकाणी महाराजांचे दर्शन घेत मानाचा मुजरा केला.



मोहोपाडा परिसरात शिवसेना शाखा मोहोपाडा व मोहोपाडा रसायनी पाताळगंगा परिसर यांच्या विद्यमाने मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. सकाळपासूनच मोहोपाडा मार्केट येथील शिवपुतळ्याला दर्शनासाठी शिवभक्तांची रांग लागली होती. यावेळी आकर्षक रोषणाई व साकारलेले चलचित्र लक्ष वेधून घेत होते. शिवजयंतीनिमित्त शिवाजी महाराजांचा अभिषेक मिरवणूक, सत्यनारायणाची पूजा, मोहोपाडा आळी आंबिवली यांच्या भजनाचा कार्यक्रम सादर झाला.

यावेळी वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमाताई मुंढे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्या प्रतिक्षा राऊत ,रसिका खराडे ,प्रशाली खाने ,वेदिका पाटील,माजी सरपंच रोशन राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश म्हात्रे,सामाजिक कार्यकर्ते राकेश खराडे , शशि मुकादम,अनिल पिंगळे, अजित सावंत,निलेश जुनगरे,व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी यांनी मोहोपाडा येथील शिवपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच भारतीय जनता पक्ष विभागातर्फे नवनिर्वाचित रिस पंचायत समिती सदस्य कृष्णा पारंगे, वासांबे पंचायत समिती सदस्य अर्चना भोईर, विभागीय अध्यक्ष राकेश खारकर, माजी सरपंच सचिन तांडेल, कैलास म्हात्रे, सरपंच प्रतिप पाटील, स्वप्निल राऊत, चेतन जाधव, भानुदास जांभळे यांच्यासह महिला वर्गांनी मोहोपाडा येथील शिवपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

चांभार्ली येथे कामगार नेते अशोक मुंढे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## 'दिबां'च्या नावासाठी आझाद मैदानात आंदोलन

**मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव द्यावे या मागणीसाठी राज्य सरकारने विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात ठराव मंजूर केला व तो पुढील कार्यवाहीसाठी केंद्र सरकारकडे पाठवून दिला. हा ठराव केंद्राने मंजूर करून या विमानतळाला 'दिबां'चे नाव द्यावे यासाठी २३ फेब्रुवारीपासून मुंबईत आझाद मैदानात प्रकल्पग्रस्तांचे ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याचे सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी सरचिटणीस दीपक म्हात्रे, खजिनदार जे.डी. तांडेल, सहचिटणीस डी.बी. पाटील, दीपक पाटील आदी उपस्थित होते.

## कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूलचा स्नेहसंमेलन सोहळा प्रेरणादायी

आपल्या लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज, कामोठे या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अनुभवण्याचा योग आला आणि मनापासून सांगावेसे वाटते की, हा सोहळा अत्यंत प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला. हे स्नेहसंमेलन म्हणजे केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचा, शिस्तीचा आणि संस्कारांचा भव्य उत्सव होता तसेच तो अत्यंत देखण्या व दर्जेदार पद्धतीने साकारला गेला.

संपूर्ण कार्यक्रम अनुभवताना यामागे एक कल्पक दृष्टी आणि एक सशक्त नेतृत्व असल्याचे प्रत्येक क्षणी जाणवत होते. प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वास, उत्साह आणि उत्तम तयारीनिशी केलेल्या सादरीकरणातून शाळेची ओळख अधिक उजळवली. त्यांच्या कलेतून आणि व्यक्तिमत्त्वातून शाळेने दिलेले संस्कार, शिस्त आणि मार्गदर्शन स्पष्टपणे दिसत होते. आपल्या कार्यातून समर्पण, नेतृत्व आणि समाजहिताची शिकवण देणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांची प्रेरणादायी जडणघडण 'कर्मयोगी एक अखंड प्रवास' या प्रभावीपणे सादर केल्या गेलेल्या संकल्पनेच्या माध्यमातून अनुभवायला मिळाली. नृत्य, नाट्य, भाषण किंवा इतर कोणतेही सादरीकरण असो, प्रत्येक घटकात परिश्रम, शिस्त आणि सुसंस्कृततेची छाप स्पष्ट दिसत होती. विषयांची निवड, वेळेचे नियोजन आणि संपूर्ण आयोजन इतके नेटके व शिस्तबद्ध होते की प्रत्येक क्षण मनाला स्पर्शून गेला. यामागे मुख्याध्यापिका स्वप्नाली संजय म्हात्रे आपले दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, व्यवस्थापन विभागाचे सहकार्य आणि शिक्षकवर्गाच्या अथक परिश्रमांची मोठी भूमिका निर्विवाद आहे.

अशा दर्जेदार कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नक्कीच चालना मिळते आणि शाळेची गुणवत्ता अधिक उंचावते. या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आपले व संपूर्ण शिक्षकवर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा. भविष्यातही आपल्या नेतृत्वाखाली शाळा अशीच नवनवीन यशशिखरे गाठत राहो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

**-आपला कृपाभिलाषी**
**सचिन देसाई,**
सदस्य-पालक शिक्षक संघ

पान १ वरुन

## दहावीची परीक्षा सुरू

याशिवाय काही संवेदनशील केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख ठेवण्यात येणार आहे. कॉपी रोखण्यासाठी जिल्ह्यात एकूण २४ भरारी पथके नियुक्त करण्यात आली आहेत. महिला अधिकाऱ्यांचे स्वतंत्र भरारी पथकही कार्यरत आहे.

परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याची सखोल तपासणी केली जात आहे. मुलींची झडती महिला शिक्षिका आणि मुलांची झडती पुरुष शिक्षक घेतील. केंद्राबाहेर गोंधळ घालणे किंवा कॉपीसाठी मदत करणे आढळल्यास संबंधित पालकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. ज्या केंद्रावर गैरप्रकार आढळतील, त्या केंद्राची पुढील वर्षासाठीची मान्यता रद्द केली जाणार आहे.

## उलवे नोडमध्ये रंगला 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा'

सोहळा यशस्वी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीसह गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावाखाडी, उलवे, वहाळ, मोरावे, बामणडोंगरी, जावळे आणि उलवे नोड येथील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमामुळे शिवरायांच्या विचारांचा जागर झाला आणि परिसरातील सांस्कृतिक एकजूटही अधोरेखित झाली.

## श्रीवर्धन येथे शिवकालीन हत्यारांसह विविध वस्तूंचे प्रदर्शन



**श्रीवर्धन : बातमीदार**

शिवरुद्र बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या शिवरुद्र अकॅडमी तर्फे श्रीवर्धन नगरपरिषद शाळा क्रमांक १ च्या टेरेस वरती विविध शिवकालीन हत्यारे, गडकिल्ल्यांची कुलपे व चाव्या त्याचप्रमाणे युद्धात वापरल्या जाणाऱ्या इतर वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. शिवजयंतीचे औचित्य साधून शिवरुद्र अकॅडमीचे संस्थापक शैलेंद्र गंगाराम ठाकूर यांनी हा स्तुत्य उपक्रम श्रीवर्धन येथे आयोजित केला होता.

या सर्व हत्यारांचे प्रदर्शन पाहण्यासाठी श्रीवर्धनचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष अतुल चौगुले, उपनगराध्यक्ष अनंत गुरव यासह विविध शालेय विद्यार्थ्यांनी सदर प्रदर्शनाचा लाभ घेतला व हत्यारंबाबत माहिती करून घेतली. शिवकालीन हत्यारांसोबतच त्यावेळची शिवकालीन नाणी, त्यानंतरची जुनी नाणी याचे देखील प्रदर्शन त्या ठिकाणी भरवण्यात आले होते. या संस्थेचे संस्थापक शैलेंद्र ठाकूर हे स्वतः यातील बहुतांश हत्यारे चालविण्यात पारंगत आहेत. त्याचप्रमाणे ते कराटेचे क्लासेस देखील घेतात. सर्व उपस्थितांनी आयोजित केलेल्या या स्तुत्य कार्यक्रमाबाबत आयोजक शैलेंद्र ठाकूर व अ‍ॅड. तेजस ठाकूर यांचे अभिनंदन केले.

आजची नवीन पिढी मोबाईल मध्ये हरवलेली असताना नवीन पिढीला शिवकालीन इतिहास व शिवकालीन हत्यारांची माहिती करून देण्याच्या उद्देशाने हे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

# सिडको महामंडळात शिवजयंती उत्साहात साजरी



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको एम्पलॉईज युनियनतर्फे शिवजयंती उत्सव सोहळा सिडको भवन येथे उत्साहाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको; गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि विनु नायर, व्यवस्थापक (कार्मिक), सिडको हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यांसोबत सुभाष पाटील, अध्यक्ष, सिडको एम्प्लॉईज युनियन, नितीन कांबळे, सरचिटणीस, सिडको एम्प्लॉईज युनियन, यांसह सिडकोतील विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना गणेश देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज हे अतुलनीय असून त्यांचे प्रजाहितदक्षपणा, सर्वांना समान न्याय, कर्तव्यनिष्ठा असे विविध गुण सर्वांनी अंगी बाणवण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस उदय साटम दिग्दर्शित शिव स्वराज्य गाथा या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधारित जीवनावर आधारित भव्य संगीतमय नाट्यकृतीने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

## निवडक

### करंजाडेत दागिन्यांची चोरी

**पनवेल :** घरामध्ये प्रवेश करून चोराने सोन्याच्या चांदीच्या दागिन्यांची चोरी केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रीया कांबळे या सिद्धिविनायक प्रारंभ सोसायटी, सेक्टर आर थ्री, करंजाडे येथे राहत असून त्यांच्या दरवाजाचे कुलूप उघडून चोराने आत मध्ये प्रवेश केला आणि ५७ हजार रुपयांचे चांदीचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

### अपघातात मुलगी जखमी

**पनवेल :** वेगाने आलेल्या डंपरने चार चाकी कारला पाठीमागून धडक दिली. या झालेल्या अपघातात कारमधील त्रिशिका मिथिल राणे (वय नऊ) ही जखमी झाली तसेच कारचे नुकसान झाले. या अपघाताप्रकरणी डंपर क्रमांक एम एच ४७ बी वाय १२२० वरील चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिथिल राणे हे घाटकोपर येथे राहत असून ते मारुती सुझुकी कार (एमएच ०३ इबी ८३५३) घेऊन देवगड सिंधुदुर्ग येथे निघाले. सकाळी आठच्या सुमारास पाठीमागून आलेल्या डंपर ने त्यांच्या कारला धडक दिली. या अपघातात त्यांची मुलगी जखमी होऊन बेशुद्ध झाली. या अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.


### उलवे येथे शिवजयंती उत्साहात



**उरण :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उलवे शहरतर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौक, सेक्टर १९, उलवे येथे शिवजयंती उत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले होते. मोफत आरोग्य शिबिर, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ, मोफत रक्त गट तपासणी, शालेय विद्यार्थ्यांचा गौरव, हळदी कुंकू समारंभ, चित्रकला व निबंध स्पर्धा, मान्यवराचे स्वागत व मनोगत अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवभक्त, शिवप्रेमी या शिवजयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, अशी माहिती राष्ट्रवादीचे उलवे शहराध्यक्ष संतोष काटे यांनी दिली आहे.

### मोरबे येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** मोरबे येथून एक विवाहित महिला बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात



करण्यात आली आहे. सोनाली विनोद पाटील (वय २८ वर्षे) असे या महिलेचे नाव असून ती अंगाने सडपातळ, उंची पाच फुट एक इंच, रंग गोरा, नाक सरळ, केस काळे व लांब, डोळे काळे, हिंदी व मराठी बोलते अंगात जाभळ्या रंगाची सारी, पायात चॉकलेटी रंगाची चप्पल आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे (८९७५८०९४१०) किंवा हवालदार होलगीर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### विविध ठिकाणी शिवजयंती

**पनवेल :** स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन चे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विविध ठिकाणच्या शिवजयंती महोत्सवात उपस्थिती दर्शवली. पनवेल महानगरपालिकेने आयोजित केलेला शिवजयंती महोत्सव, पनवेल शहरातील मध्यवर्ती बाजारपेठेतील फुल बाजार येथील शिवजयंती उत्सव, त्याचप्रमाणे वडघर ग्रामपंचायत हद्दीतील शिवजयंती महोत्सव येथे महेश साळुंखे यांनी उपस्थित दर्शवली.

### दहावीच्या परीक्षेला प्रारंभ

**उरण :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावीच्या लेखी परीक्षेला शुक्रवार (दि.२०) फेब्रुवारी पासून सुरुवात झाली असून उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयाच्या नियोजित परीक्षा केंद्रावर देखील शुक्रवारपासून, दहावीची परीक्षा सुरू झाली असून, ही दहावीची परीक्षा १८ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे. परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या पहिल्याच दिवशी अनेक पालक विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आणि त्यांचा परीक्षा क्रमांक कोणत्या ठिकाणी आहे. हे पाहण्यासाठी त्यांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. परीक्षेच्या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घेण्यासाठी परीक्षा केंद्र परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# रसायनी-कोन मार्गावर वाहतूक कोंडीचा विळखा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रसायनी-कोन परिसरातील प्रमुख रस्ता सध्या अवजड वाहनांच्या पार्किंगमुळे अक्षरशः ठप्प होत असल्याचे चित्र आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, परिसरातील नवकार, आष्टे, अपोलो लॉजिस्टिक आदी कंपन्यांकडे येणारी अवजड वाहने रस्त्यालाच पार्क केल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत प्रशासनाकडून जनजागृती, दंडात्मक कारवाई आणि विविध अटी लागू केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात परिस्थितीत फारसा बदल दिसत नाही. महामार्ग सुरक्षा पथक, वाहतूक नियंत्रण कक्ष आणि आरटीओ विभाग औपचारिक दंडात्मक कारवाई करत असले तरी अवजड ट्रकांची रस्त्यावर उभी राहणारी रांग कायम आहे. परिणामी, वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि स्थानिक रहिवाशांचा त्रास वाढत आहे.

नागरिकांच्या मते, अपुऱ्या पार्किंग सुविधेमुळे लॉजिस्टिक कंपन्या सार्वजनिक रस्त्यांचा वापर करत असून रस्ते सुरक्षा कायद्याचे उल्लंघन होत आहे. एखादा गंभीर अपघात झाल्यास जबाबदार कोण? असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर रस्ते सुरक्षा समिती स्थापन करून पर्यायी मार्ग किंवा स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उभारण्याची मागणी जोर धरत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे व खालापूर तालुका सचिव साबीर शेख यांच्यासह विविध सामाजिक घटकांकडून यासाठी पाठपुरावा सुरू आहे. आगामी काळात प्रशासन कोणती ठोस कारवाई करते, याकडे कोन-सावळा परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## साईबाबांच्या पादुकांचा दर्शन सोहळा उत्साहात




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील श्री साई मंदिरात शिर्डी येथील साक्षात श्री साईबाबांच्या पवित्र पादुकांचा दर्शन सोहळा अत्यंत उत्साहात आणि आध्यात्मिक वातावरणात झाला. १८ ते २० फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने संपूर्ण पनवेल शहर भक्तीच्या रसात न्हाऊन निघाले होते.

या सोहळ्याला शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदिच्छा भेट देऊन पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी बोलताना, पनवेलकरांच्या अफाट श्रद्धेचा पूर या सोहळ्याच्या निमित्ताने पाहायला मिळाला, असे गौरवोद्गार आमदार ठाकूर यांनी काढले.

या सोहळ्याची सुरुवात १८ फेब्रुवारी रोजी श्री साईबाबांच्या पादुकांच्या विधीवत स्वागताने झाली, ज्यासाठी शहरभर उत्साहाचे वातावरण होते. १९ फेब्रुवारी रोजी भाविकांच्या सोयीसाठी सकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत अखंड दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती, ज्याचा लाभ हजारो साईभक्तांनी घेतला. सोहळ्याच्या सांगता दिनी, म्हणजेच फेब्रुवारीला सकाळी वाजेपर्यंत भाविकांना दर्शन घेता आले आणि त्यानंतर या पवित्र पादुका शिर्डीकडे रवाना झाल्या.

या संपूर्ण नियोजनबद्ध कार्यक्रमाचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या भेटीदरम्यान पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अजय बहिरा यांच्यासह विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने साईभक्त उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमात छत्रपती शिवाजी महाराज जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



महाराष्ट्राचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात साजरी केली.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने केली. अभिषेक पाटील आणि आदेश डोके ह्या विद्यार्थ्यांनी गायलेल्या शूर आम्ही सरदार आम्हास काय कोणाची भीती या गीताने कार्यक्रमांमध्ये रंगत आणली. इयत्ता नववीमधील विद्यार्थी शिवम, सलोनी तसेच दर्शन या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणांमधून छत्रपती शिवाजी महाराजांचे गुण सादर केले तसेच इयत्ता नववी अ आणि ब च्या विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर अशा नृत्य अविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण इयत्ता नववीमधील विद्यार्थी संस्कृत रोहेकर यांनी शिवाजी महाराजांवर गायलेला पोवाडा ठरला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कार्यक्रमाचे मुख्य अतिथी संतोष चव्हाण म्हणाले की, शिवाजी महाराजांच्या आदर्श मूल्यांची आपण जपणूक केली पाहिजे त्यांचे विचार आपण आपल्या जीवनामध्ये अंगीकारले पाहिजेत अशा प्रकारच्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची सामाजिक मूल्यांची जाणीव होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पूर्वा खेडेकर यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता प्राची इसे यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. हर्षदा पवार यांचेही विशेष सहकार्य लाभले.



पनवेल : सिंधुदुर्ग रहिवासी हितवर्धक संघाच्या मालवणी जत्रोत्सवाच्या सांगतेच्या दिवशी दशावतारी नाटक झाले. या वेळी भाजप नेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली व कलाकारांशी वार्तालाप केला.



कळंबोली : भाजप मंडळच्या वतीने पक्ष कार्यालयात शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली.




पनवेल : तालुक्यातील मोरबे येथे शिवरक्षक मित्र मंडळाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली.

## सीकेटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील लेखा व वित्त विभागामार्फत तृतीय वर्ष बी.कॉम (लेखा व वित्त) विद्यार्थ्यांसाठी संशोधन पद्धती या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सोहिल पिराणी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात डॉ. सोहिल पिराणी यांनी संशोधनाची ओळख व संशोधन पद्धती या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी संशोधनाची संकल्पना, गरज, महत्त्व तसेच संशोधनाचे विविध प्रकार विद्यार्थ्यांना सविस्तरपणे समजावून सांगितले.

विश्रांतीनंतर दुसरे सत्र संशोधनातील सांख्यिकी तंत्रे या विषयावर घेण्यात आले. या सत्रात एम.एस. एक्सेलच्या (MS EXCEL) सहाय्याने माहितीचे विश्लेषण व परिकल्पनेची चाचणी कशी करावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. संशोधन करताना अचूकता, विश्लेषण कौशल्य तसेच नैतिकतेचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले.

संपूर्ण कार्यशाळेचे आयोजन सहाय्यक प्राध्यापक करण कोळी आणि सहाय्यक प्राध्यापक आलोक भानुशाली यांनी डॉ. निलेश ई. कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण कोळी यांनी प्रभावीपणे केले.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला तसेच प्रश्नोत्तर सत्रात आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी विभागामार्फत आभार प्रदर्शन करण्यात आले. ही कार्यशाळा तृतीय वर्ष बी.कॉम (लेखा व वित्त) विद्यार्थ्यांसाठी संशोधनविषयक ज्ञान वृद्धिंगत करणारी असून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस निश्चितच उपयुक्त ठरली.

या कार्यक्रमसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच संस्थेचे सचिव एस.टी.गडदे आणि प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## बेकायदेशीररित्या साठवलेला गुटखा हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल तालुक्यातील आजिवली गाव परिसरात एका किराणा विक्री करणाऱ्या दुकानात व गोदमात पनवेल तलौक पोलिसांच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात जवळपास सव्वा लाख रुपये किमतीचा गुटख्याचा साठा हस्तगत केला असून या परकरणी एकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

तालुक्यातील आजिवली गाव येथील एका किराणा दुकानात तसेच गोदामात बेकायदेशीररित्या गुटख्याचा साठा करून त्याची विक्री आरोपी रामसौदागर सहदेव भगत, (वय ६५) हा करत असल्याची गोपनीय माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्यांच्या कडून जवळपास सव्वा लाख रुपये किमतीचा विविध कंपन्यांचा केशर युक्त विमल पान मसाला हस्तगत केला.

आरोपी विरुद्ध ४३/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७५, १२३. २२३ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ चे कलम ३(१) (२२) (३१)(२२)(त) २६(२)(१), २६(२)(त) २७(३) (३) सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम २०११ ये कलम ५९(ii) भा.द.वि कलम २७३, ३२८, १८८ अन्व्ये कारवाई केली आहे.

## गव्हाण विद्यालयात विविध कार्यक्रमांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे नियोजन माधुरी म्हात्रे यांनी केले. सूत्रसंचालन हर्षला पाटील यांनी केले. या वेळी प्रतिज्ञा घरत आणि विद्यार्थ्यांनी मिळून शाळेला शिवरायांचा पुतळा भेट म्हणून दिला. या पुतळ्याचे पूजन प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले.

या वेळी पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेच्या लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, चारुशीला ठाकूर, उज्वला म्हात्रे, सारिका ठाकूर संपदा म्हात्रे, वृषाली म्हात्रे, प्रतिज्ञा घरत, मनाली बाबर, ज्योत्स्ना कोळी, माणिक घरत, अर्चना पाटील, जयराम सोनटक्के आदी उपस्थित होते.

आस्था म्हात्रे, धनश्री टिकनर, ईश्वरी चौगुले, स्पृहा, काजल सावंत, पूजा, गौरी ठोकळ या मुलींनी विविध गीत सादर केले. श्रीधर सुतार, प्रतीक पवार, अनुष्का ठाकरे या विद्यार्थ्यांनी वेशभूषा करून छत्रपती शिवाजी महाराजांवर मनोगत व्यक्त केले. आरोही नाळे हिने मी शिवाजीराजे भोसले बोलतोय. या विषयावर उत्स्फूर्त भाषण केले.

यानंतर प्रभात फेरी काढण्यात आली. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या मैदानावर प्रभात फेरी नेण्यात आली. यावेळी विद्यालयाचा चुणचुणीत विद्यार्थी वैष्णव सचिन देशमुख यानेही शिवगर्जना केली.


## संपादकीय

# तुष्टीकरणावर प्रश्नचिन्ह

आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर तामिळनाडूतील मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारने अकस्मात सरसकट सगळ्यांसाठी मोफत वीज योजना जाहीर केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी तामिळनाडू सरकारला चांगलेच धारेवर धरले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सरकारकडून मदत मिळाली तर त्यास हरकत घेण्याचे कारण नाही. परंतु ज्यांना वीजेची किंमत चुकती करणे परवडू शकते अशा नागरिकांना मोफत वीज देऊन सरकार काय साध्य करणार आहे असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारला विचारला आहे.

**सर्वोच्च न्यायालयाने रेवडी संस्कृतीला यापूर्वीही आक्षेप घेतला आहे. निवडणुकांच्या तोंडावर सरसकट सर्व नागरिकांना रेवड्यांचे वाटप करण्याची संस्कृती देशाच्या विकासावर विपरित परिणाम करणारी ठरेल असे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने आता ओढले आहेत. देशात कल्याणकारी राज्य असल्यामुळे गरजूंना मदतीचा हात देण्यात काही चुकीचे नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले. निवडणुकांच्या तोंडावर राज्यातील सरसकट सगळ्यांना मोफत वीज पुरवण्याची योजना तामिळनाडूतील द्रमुक सरकारने अकस्मात आखली. या योजनेसंदर्भात 'तामिळनाडू पॉवर डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशन'ने सर्वोच्च न्यायालयासमोर याचिका दाखल केली असून याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने देशातील बहुतांश राज्ये महसुली तुटीची असूनही विकासाकडे दुर्लक्ष करून मोफत योजना जाहीर करू लागली आहेत याकडे लक्ष वेधले. दारिद्र्यरेषेखालील लोकांना, ज्यांना दोन वेळचे अन्नही मिळत नाही त्यांना मदतीचा हात देणे आवश्यक आहे. देशातील जनता दारिद्र्यरेषेच्या वर आल्यावर अशा मदतीची गरज पडणार नाही. आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकांसाठी मोफत योजना नाहीत असे मत भारतीय जनता पक्षाकडून यासंदर्भात व्यक्त करण्यात आले आहे. एखाद्या गोष्टीची किंमत मोजू शकणारे लोक व किंमत मोजणे न परवडणारे लोक यात सरकारने फरक करायलाच हवा अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाने घेतली आहे. वीजेची किंमत न परवडणाऱ्या लोकांना दरांमध्ये काही सवलत देणे समजून घेता येईल. पण सरसकट सगळ्यांना मोफत खिरापत वाटण्याला निवडणूकपूर्व तुष्टीकरण का म्हणू नये असा योग्य सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. देशाच्या प्रगतीवर परिणाम करू शकणाऱ्या अशा धोरणांचा पुनर्विचार केला जायला हवा. सगळ्यांच्या कल्याणाच्या योजना आखणे हे सरकारचे काम आहे. पण जे किंमत मोजू शकतात, त्यांना ती मोजायला भाग पाडणे ही देखील सरकारची जबाबदारी आहे. पात्रतेचे कोणतेही निकष न ठरवता सरसकट सगळ्यांना अशा लाभांचे धनी केले तर या सगळ्याचा भूर्दंड सरकारलाच सोसावा लागेल. कोणतेही आर्थिक नियोजन न करता अचानक अशा बेजबाबदार रेवड्यांची घोषणा केल्यास सरकारच्या तिजोरीवर ताण येईल असे नमूद करत संबंधित घोषणेच्या निवडणूकपूर्व टाइमिंगवर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह लावले आहे. तिन्ही वेळ मोफत जेवण, मोफत सायकल, मोफत वीज असे सारे काही जनतेला मोफत मिळू लागले तर लोकांनी काम कशासाठी करायचे? या रेवडीवाटपाचा राज्यातील कार्यसंस्कृती व आर्थिक विकासावर दुष्परिणाम होणार नाही का असा सवाल करत या रेवड्यांचा भूर्दंड सरतेशेवटी करदात्यांवरच पडणार आहे याकडेही न्यायालयाने लक्ष वेधले. पायाभूत सुविधा, रस्ते, रुग्णालये, शाळा, वैद्यकीय महाविद्यालये या साऱ्यांची उभारणी हे सरकारचे काम आहे. त्याऐवजी राज्यसरकारे निवडणुकांच्या आधी सायकली, कपडे, जेवण वाटत बसली तर देशाचा विकास कसा होणार असा सुयोग्य सवाल सर्वोच्च न्यायालयाने आता केला आहे.**

# आज आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन




२१ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन भाषिक आणि सांस्कृतिक विविधता आणि बहुभाषिकतेची जाणीव वाढवण्यासाठी जगभरात दरवर्षी साजरा केला जातो. नोव्हेंबर १९९९ मध्ये युनेस्कोच्या जनरल कॉन्फरन्सने हा दिवस घोषित केला होता.

आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाला टंग डे, मदर लँग्वेज डे, मदर टंग डे, लँग्वेज मूव्हमेंट डे आणि ड्ढेहळव उ्ळलीह या नावाने देखील ओळखले जाते. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वापराने जगभरातील अनेक मातृभाषा लोप पावत चालल्याचे चित्र आहे. मात्र असे होऊ नये यासाठी युनेस्कोने पुढाकार घेत मातृभाषा आणि त्यासोबत संबंधित संस्कृती टिकावी यासाठी आजच्या दिवसाची निवड केली आहे.

आजच्या सर्व मुलांना व्हॅलेंटाइन डे माहिती आहे. परंतु बहुतांश मुलांना मराठी भाषा दिनाची माहिती नसणार ही वस्तुस्थिती आहे. मातृभाषा टिकवण्यासाठी जनजागृती आवश्यक असून, त्याची खरी सुरुवात ही कुटुंबातूनच होणे अत्यावश्यक आहे. जागतिकीकरण ही वस्तुस्थिती असून ते स्वीकारलेच पाहिजे. कारण त्यामुळे आर्थिक विकास झाल्याचे नाकारता येणार नाही. आता जागतिकीकरण खेड्यांपर्यंत पोहोचलेले आहे. जागतिकीकरणात मातृभाषा टिकवण्याचे मोठे आव्हान असून, मातृभाषेला धोका घरातूनच असल्याने मातृभाषा जतनाची सुरुवात कुटुंबातूनच होण्याची गरज आहे.

जागतिकीकरणाच्या जमान्यात मातृभाषेसह आणखी एक भाषा येणे गरजेचे बनले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील ३८ टक्के विद्यार्थ्यांचे कम्युनिकेशन स्कील पूअर असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे. बॅलन्स साधता आला पाहिजे. अमेरिकेतील १५५ शाळांमध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार दोन भाषा येत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अधिक प्रगती असल्याचे दिसून आले आहे.

प्रत्येकाला आपापली मातृभाषा म्हणजे काय हे माहीतच असेल. सध्याच्या प्रगत तंत्रज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे आपण आपण अनेक भाषा बोलतो आणि शिकतो, परंतु आपल्या मनावर पकड असते ती आपल्या मातृभाषेची.

मातृभाषेला मान देणे म्हणजे काय? तसेच आजच्या प्रगत आणि बदलत्या काळात एक जीव दोन नवीन भाषा येणे हे किती महत्त्वाचे आहे त्याचा तुम्हाला तुमच्या भविष्यात नोकरी मिळवण्यासाठी कसा उपयोग होऊ शकतो हे सांगू शकते. जर आपण दाक्षिणात्य राज्यात गेला असाल तर तिथे फक्त एकच भाषा बोलली जाते जी त्या राज्याची राजभाषा असते. जर आपण परराज्यातून असाल तर ती भाषा अवगत केल्याशिवाय गत्यंतर नसते. भाषेचा स्वाभिमान कसा जपावा हे यांच्याकडून आपण शिकले पाहिजे.

याउलट आपल्या महाराष्ट्र राज्यात मराठी साठी इतकी तत्परता दाखवली जात नाही. तर सर्रास हिंदी भाषेचा वापर केला जातो. खाजगी क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये दोन मराठी माणसे देखील एकमेकांशी हिंदी मध्ये संवाद करतात. का? मराठी बोलायची लाज वाटते? व्वा रे सो कॉल्ड एज्युकेटेड पीपल. आपल्यालाच आपली मातृभाषा बोलायला का लाज वाटते? आपल्याला कधी आपल्या आईची लाज वाटते का? नाही ना? मग आपण आपल्या मातृभाषेला का हिन लेखतो? जर आपणच तिचा उचित सन्मान नाही केला तर बाकीच्या लोकांकडून अपेक्षा करण हे चुकीचं आहे. नुसते २७ फेब्रुवारीला आणि २१ फेब्रुवारीला एक दिवासापुरत भाषेविषयी प्रेम दाखवून किंवा रॅली काढून, स्पर्धा ठेवून आणि व्हॉट्सप वर स्टेटस ठेवून होणार नाही. त्याकरता मनातून आपल्या मातृभाषेचा अभिमान वाटायला हवा. जर का आपण आपल्या मातृभाषेला आदर दिला तिला सन्मान दिला तर आपले स्टेटस हे नक्कीच उंचावेल. मग आपल्याला आपल्या मातृभाषेच्या करता कोणाची लाचारी करायला लागणार नाही. प्रत्येक भाषेविषयी आपल्या मनात आदर हवाच. प्रत्येक भाषेचा दर्जा हा वेगळा आहे.

भाषा ही एकमेकांना जोडण्याचे काम करते आणि मातृभाषा ही आपल्या माणसांना एकत्र आणते. भाषा हा सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. आपली भाषा आपल्या संस्कृतीची ओळख असते. भाषेत स्वतःचाच एक गोडवा असतो. तो गोडवा आपल्याला जगता आला पाहिजे. शालेय शिक्षणातही मराठी भाषा नाही. मराठी शाळा बंद होत चालल्या आहेत. इंग्रजी माध्यमाचा वाढता प्रभाव पाहता मराठी ज्ञानभाषा होणार असे म्हणता येणार नाही. शालेय शिक्षणात मराठीचा वापर वाढला तरच पुढची पिढी मराठी बोलू शकेल. अथवा मराठीचा विसर पडेल आणि ज्ञानभाषा तर सोडाच बोली भाषादेखील असणार नाही.

भाषा महत्त्वाच्या: आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाचा रौप्यमहोत्सवी उत्सव भाषा, मग ती लाखो लोक बोलतात किंवा काही हजार स्थानिक भाषिक, लोकांना जोडतात आणि संबंधित संस्कृतीशी अविभाज्यपणे जोडल्या जातात. तथापि युनेस्कोच्या अंदाजानुसार, दर दोन आठवड्यांनी एक भाषा नाहीशी होते – आपल्या सामूहिक सांस्कृतिक वारशाचे हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.

**भाषांविषयी १० तथ्ये**

* युनेस्कोच्या अंदाजानुसार, जगातील लोक ८,३२४ वेगवेगळ्या भाषांमध्ये संवाद साधतात.

* यापैकी फक्त १,४०० भाषा कायदेशीररित्या मान्यताप्राप्त आहेत.

* सुमारे १,५०० भाषा नामशेष होण्याच्या धोक्यात आहेत, आज बोलल्या जाणाऱ्या ५०% भाषा गंभीरपणे धोक्यात येतील किंवा २१०० पर्यंत त्या गायब होतील.

* जगाच्या सर्व भागात सुमारे ७० दशलक्ष कर्णबधिर लोक राहतात. ते सुमारे ३०० वेगवेगळ्या सांकेतिक भाषा वापरतात.

* युएन जनरल असेंब्लीने स्थानिक भाषांच्या नष्ट होण्याकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांच्या संवर्धनाला प्रोत्साहन देण्यासाठी २०२२-२०३२ हे वर्ष स्थानिक भाषा दशक म्हणून घोषित केले.

* युनेस्कोच्या जागतिक भाषांच्या यादीत सूचीबद्ध केलेली पहिली भाषा सोलोमन बेटांवर बोलली जाणारी Are'are आहे, शेवटची नोंद नूहिश आहे, जी भारत आणि म्यानमारच्या काही भागात वापरली जाणारी भाषा आहे. दोन्ही धोक्यात येणाऱ्या भाषा म्हणून वर्गीकृत आहेत.

* मानवी हक्कांचा सार्वत्रिक जाहीरनामा हा जगातील सर्वात जास्त अनुवादित दस्तऐवज आहे आणि तो ५०० हून अधिक भाषांमध्ये उपलब्ध आहे.

* संयुक्त राष्ट्रसंघात बहुभाषिकतेसाठी एक समन्वयक आहे, ज्याला संयुक्त राष्ट्रसंघ सचिवालयात बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्याचे काम सोपवले आहे आणि या विषयावर कोणत्याही चिंता व्यक्त करणाऱ्या सदस्य राष्ट्रांसाठी संपर्काचा पहिला बिंदू आहे. ही भूमिका सध्या मोव्हसेस अबेलियन यांच्याकडे आहे, जे महासभा आणि परिषद व्यवस्थापन विभागाचे प्रमुख देखील आहेत.

* संयुक्त राष्ट्रसंघ जिनेव्हा येथे सुमारे १०० दुभाषे काम करतात, जे दरवर्षी सुमारे २,७०० बैठकांना एकाच वेळी अर्थ लावतात, ज्यामुळे अधिक लोकांना संयुक्त राष्ट्रसंघात होणाऱ्या चर्चांचे अनुसरण करण्यास आणि समजून घेण्यास मदत होते.

* संयुक्त राष्ट्रसंघ जिनेव्हा येथील भाषांतरकार दरवर्षी सुमारे ८० दशलक्ष शब्दांचे भाषांतर करतात – अधिकृत दस्तऐवज जे सर्व सदस्य राष्ट्रांनी समजून घेतले पाहिजेत आणि अंमलात आणले पाहिजेत.

भारत बहुभाषिक आहे– भारत हा विविध संस्कृतींचा आणि वेगवेगळ्या भाषांचा देश आहे. १९६१ च्या जनगणनेनुसार, भारतात १६५२ भाषा बोलल्या जातात. तथापि, एका अहवालानुसार, सध्या भारतात १३६५ मातृभाषा आहेत, ज्यांचे प्रादेशिक आधार वेगवेगळे आहेत. हिंदी ही दुसरी सर्वात लोकप्रिय मातृभाषा आहे. देशात ४३ कोटी लोक हिंदी बोलतात, त्यापैकी १२ टक्के लोक द्विभाषिक आहेत. (साभार : इंटरनेट)




## मोबाईल फोन नेमका चार्जिंगला केव्हा लावावा?

अलिकडे मोबाईल फोनची आवश्यकता एवढी वाढली आहे की, तो नेहमीच फूल चार्ज असावा, असे लोकांना वाटते. यामुळे काही लोक तर बॅटरी थोडी जरी कमी झाली, तरी फोन चार्जला लावतात, पण असे करणे योग्य आहे का? तर उत्तर आहे नाही.



हल्ली मोबाईल हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक झालेला आहे. एका बाजूला फोनवरून संवाद साधणे ही त्याची प्राथमिक उपयुक्तता, तर दुसरीकडे मोबाईलमुळे अनेक कामेही करता येतात. शिवाय या माध्यमातून अपडेटदेखील राहता येते. म्हणूनच त्याचा वापर दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणात होत असतो. फोन नेमका केव्हा चार्जिंगसाठी लावायला हवा? हे फार थोड्या लोकांना माहिती असेल. अनेक लोक वारंवार फोन चार्जिंगला लावताना दिसून येतात, मात्र असे करणे योग्य नाही. फोनची बॅटरी किती टक्क्यांवर आली की फोन चार्जिंगला लावायला हवा? जाणून घ्या...

फोनची बॅटरी चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी सर्वांत चांगली पद्धत म्हणजे फोन २०%वर आला की चार्जला लावावा आणि ८०-९०%पर्यंतच चार्ज करावा. जर आपण फास्ट चार्जिंगचा वापर करीत असाल तर हे विशेषत्वाने महत्वाचे आहे, कारण ०%पासून चार्ज केल्याने बॅटरी खूप अधिक गरम होते आणि ८०%हून अधिक फास्ट चार्जिंग कमी कार्यक्षम होते.

बॅटरी ओव्हरचार्ज करण्यात कसल्याही प्रकारचा धोका नाही. आजकाल बहुतेक फोनमध्ये बॅटरीच्या हेल्थसाठी अनेक इन-बिल्ट फीचर्स असतात. जसे की फोन ०%पर्यंत पोहचण्यापूर्वीच बंद करणे. जर आपण आपला फोन अधिक काळ न वापरण्याचा विचार करीत असाल, तर तो अर्धा चार्ज करणे हा एक उत्तम पर्याय आहे. महत्वाचे म्हणजे दर सहा महिन्यांनी फोन चालू करण्याचा आणि बॅटरी सुरक्षित ठेवण्यासाठी ५०%पर्यंत चार्ज करण्याचा सल्ला ॲपलकडून दिला जातो.


याशिवाय लोकल स्वस्तातले चार्जर हे फोन आणि यूजर दोहोंसाठीही असुरक्षित असते, कारण यात कंपोनन्ट व्यवस्थितपणे इंस्युलेट केलेले नसतात. यामुळे शॉर्टसर्किट आणि आग लागण्याचा धोकाही वाढतो. त्यामुळे मोबाईल योग्य प्रकारे हाताळण्याबरोबरच त्याला सुयोग्य चार्जिंग करणेही आवश्यक आहे.

# दिग्गज अभिनेत्री जयश्री गडकर

जयश्रीच्या अभिनयाची तुलना करायचीच झाली, तर ती लताच्या गाण्याशीच करावी लागेल. संगीत क्षेत्रात लताचे जे श्रेष्ठत्व आहे, ते श्रेष्ठत्व जयश्री गडकरने अभिनय क्षेत्रात संपादन केले आहे' असे मत दिग्दर्शक दिनकर द. पाटील यांनी जयश्री गडकर यांच्याविषयी व्यक्त केले होते.

कारवार जिल्ह्यातील सदाशिवगड तालुक्यातील कणसगिरी या गावी २१ फेब्रुवारी १९४२ रोजी जयश्री गडकर यांचा जन्म झाला. मध्यमवर्गीय कुटुंबात त्यांचे बालपण गेले. वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षीच त्या मुंबईत आल्या. मुंबईत खेतवाडीतल्या महानगरपालिकेच्या शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. पुढे गिरगावच्या राममोहन हायस्कूलमधून त्यांनी शालान्त परीक्षा दिली.

शिक्षणाची आवड असूनही त्यांना फार शिक्षण घेता आले नाही. मात्र लहानपणापासून त्यांना गाण्याची आवड होती. ताल-सुरांचे उपजत ज्ञान होते आणि गळाही गोड होता. त्यामुळे मास्टर नवरंग यांच्याकडे त्या गाणे शिकल्या. जयश्री गडकर यांनी १९५०-१९५४ या काळात हौशी रंगभूमीवर कामे केली. याच काळात त्या शास्त्रीय नृत्यही शिकल्या.



**निमित्त**

जयश्री गडकर यांनी सुरुवातीच्या काळात राजकमलकलामंदिरात नोकरी केली.

याच काळात व्ही. शांताराम यांना आपल्या 'झनक झनक पायल बाजे' (१९५५) या चित्रपटासाठी एका समूहनृत्यात सहनर्तिका हव्या होत्या. संध्या या चित्रपटाची नायिका होत्या. व्ही. शांतारामसारखे दिग्दर्शक आणि सप्तरंगी हिंदी चित्रपट या आकर्षणामुळे त्यांनी या चित्रपटात समूहनृत्यातून आपली नृत्यकला सादर केली. या नृत्याने त्यांना 'दिसतं तसं नसतं' या चित्रपटात एका नृत्यासाठी काम मिळाले. मात्र केवळ नृत्य करण्याइतकी भूमिका करायची नाही, असे त्यांनी या चित्रपटानंतर ठरवले. यानंतर 'गाठ पडली ठका ठका' या चित्रपटात नायिका म्हणूनत्यांना प्रथमच भूमिका मिळाली. २१ मार्च १९५६ या दिवशी त्या नायिका म्हणून पडद्यावर आल्या, याच दिवशी योगायोगाने त्यांनी वयाची १६ वर्षे पूर्ण केली.

१९५७ साली फिल्मिस्तानच्या 'आई मला क्षमा कर' आणि 'पहिलं प्रेम' या चित्रपटातून त्यांनी प्रमुख भूमिका केल्या. फिल्मिस्तानचा पहिला चित्रपट होता 'आलिया भोगासी'. या चित्रपटात जयश्री गडकर यांनी राजा गोसावींबरोबर प्रमुख भूमिका केली आणि नंतरच्या कारकिर्दीत राजा गोसावींबरोबर त्यांनी अनेक चित्रपटांतून नायिकेच्या भूमिका केल्या, त्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या.यानंतर 'चेतना चित्र'चा चित्रपट प्रदर्शित झाला. 'सांगत्ये ऐका' (१९५९) या चित्रपटात जयश्री गडकर यांनी तमासगिरिणीची भूमिका रंगवली. त्यातल्या 'बुगडी माझी सांडली गं...'या लावणी नृत्याने जयश्री गडकर यांना मराठी चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट नृत्यांगना म्हणून कायमचे स्थान मिळाले.

त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीची दखल घेऊन ३० एप्रिल २००३ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांना 'व्ही. शांताराम पुरस्कार' दिला. याअभिनेत्रीचे मुंबई येथे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रक्तातील साखर कमी करण्यासाठी व्यायाम...

व्यायाम हा प्रत्येकासाठीच आवश्यक आहे, परंतु जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुम्ही व्यायामाला विशेष महत्त्व दिले पाहिजे. तुमची रक्तातील साखर कमी करण्याव्यतिरिक्त व्यायामामुळे रक्तदाबही कमी होतो तसेच चांगल्या झोपेसाठीही व्यायामाची मदत होते.



एरोबिक व्यायाम : या स्वरूपाचे व्यायाम किंवा कार्डिओ व्यायाम, मधुमेह आणि प्री-डायबेटिस परिस्थितींमध्ये फायदेशीर आहेत. या व्यायामांमध्ये होणाऱ्या तालबद्ध हालचाली हृदयाची गती वाढवतात आणि श्वाचछोसश्वास सुधारतात, ज्यामध्ये जॉगिंग, सायकलिंग किंवा पोहणे समाविष्ट असू शकते. जास्तीत जास्त फायदे मिळवण्यासाठी आठवड्यातून किमान १५० मिनिटे एरोबिक व्यायाम करण्याचा सल्ला दिला जातो.

योग : काही आसनांमुळे शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची पातळीही कमी होते. त्रिकोनासन, ताडासन, सुखासन, पद्मासन, मंडुकासन, भस्त्रिका प्राणायाम, अर्धमत्स्येंद्रासन, पवनमुक्तासन, भुजंगासन, वज्रासन आणि धनुरासन यासारखी विशिष्ट योगासने मधुमेहासाठी फायदेशीर आहेत.

सूर्यनमस्कार : सूर्यनमस्कार हा एक संपूर्ण व्यायाम आहे. त्यामध्ये पायाच्या बोटांपासून डोक्यापर्यंत प्रत्येक अवयवाला फायदा मिळतो. सूर्यनमस्कार केल्याने तुमच्या संपूर्ण शरीराची स्थिती सुधारते. हे तुमच्या स्नायूंसाठी फायदेशीर आहे.

स्ट्रेंथ ट्रेनिंग : हा एक प्रकारचा शारीरिक व्यायाम आहे, जो स्नायूंच्या वाढीसाठी, चयापचय सुधारण्यासाठी आणि प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी केला जातो. हे ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या स्त्रियांना स्नायू कमकुवत होणे, ऑस्टिओपोरोसिस आणि वजन वाढणे यासारखे वृद्धत्वाचे परिणाम टाळण्यास मदत करू शकते. यामुळे पोश्चर, संतुलन, गतिशीलता आणि आत्मविश्वासदेखील सुधारू शकते. मधुमेह आणि पूर्व-मधुमेह असणाऱ्यांसाठी या प्रकारचा व्यायाम खूप फायदेशीर आहे.उच्च-तीव्रता व्यायाम : यामध्ये थोड्या काळासाठी तीव्र व्यायाम आणि त्यानंतर विश्रांतीचा कालावधी समाविष्ट असतो. कॅलरी बर्न करण्याचा आणि इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्याचा हा एक प्रभावी मार्ग असू शकतो. तथापि, दुखापत टाळण्यासाठी हळूहळू सुरुवात करणे आणि हळूहळू तयार होणे महत्त्वाचे आहे.

# पालीत नेटवर्क नॉट रिचेबलच!

## ‘जिओ’ची सेवा ढासळली, ग्राहक संतप्त

**पाली : प्रतिनिधी**

पाली व परिसरात जिओच्या मोबाईल नेटवर्कची सध्याची अवस्था केवळ तांत्रिक बिघाडापुरती मर्यादित राहिलेली नाही; ती थेट ग्राहकांच्या संयमाची परीक्षा घेणारी ठरत आहे. मोबाईलवर सतत दिसणारा ‘नॉट रिचेबल’ हा संदेश, वाढते कॉल ड्रॉप आणि वारंवार ठप्प होणारी इंटरनेट सेवा हे आता अपवाद राहिले नसून जिओ ग्राहकांचे रोजचे वास्तव बनले आहे.

जिओने देशात अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रचंड गुंतवणूक आणि दर्जेदार सेवेचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात पालीसारख्या ग्रामीण–निमशहरी भागात हीच अत्याधुनिक यंत्रणा कुचकामी ठरत असल्याचा



अनुभव ग्राहक घेत आहेत. वर्षभराचे प्लॅन भरूनही फोन उपयोगात येत नसेल, तर ग्राहकांनी पैसे नेमके कशासाठी भरायचे, हा मूलभूत प्रश्न उभा राहतो.

पॅकेज संपले की क्षणाचाही विलंब न करता इन्कमिंग–आउटगोइंग बंद केले जाते; मात्र पॅकेज सुरू असताना दर्जेदार नेटवर्क देण्याची जबाबदारी मात्र ढकलली जाते. ही सेवा नाही, तर केवळ वसुलीची व्यवस्था असल्याची भावना ग्राहकांमध्ये बळावत आहे. सेवा देण्यात अपयश येत असताना ग्राहकांनी गप्प बसावे, अशीच जिओची अपेक्षा आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

पालीतील व्यापारी जिओचे ग्राहक सचिन खिवंसरा म्हणतात, आम्ही वेळेवर पैसे भरतो, वर्षाचे पॅकेज घेतो; पण नेटवर्कच नसेल तर मोबाईल कशासाठी? अत्यावश्यक कॉलही होत नाहीत. पॅकेज संपले की लाईन बंद होते, मग पॅकेज असूनही रेंज देऊ शकत नसतील तर जिओ घ्यायचेच का? हा सवाल केवळ एका ग्राहकाचा नसून संपूर्ण परिसराचा आहे.

ग्राहकसंख्या झपाट्याने वाढवताना त्या तुलनेत टॉवर क्षमता, नेटवर्क विस्तार आणि देखभाल याकडे दुर्लक्ष झाले आहे. ग्राहकसंख्या आणि टॉवर क्षमतेतील तफावत वाढली असेल, तर त्याची किंमत ग्राहकांनी मनस्ताप सहन करून का भरावी? अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा गवगवा करून प्रत्यक्षात अपुरी सेवा देणे ही ग्राहकांशी फसवणूकच नव्हे काय?

ग्राहकांना सेवा हवी, जाहिरात नाही. रिलायन्स जियो ने तातडीने नेटवर्कची वस्तुस्थिती स्वीकारून टॉवर क्षमता वाढवावी, कॉल ड्रॉप थांबवावेत दर्जेदार सेवा द्यावी

# खालापुरात परप्रांतीय कामगारांकडून आदिवासींना मारहाण; दोघांना अटक

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील मौजे कलोते मोकाशी ठाकूरवाडी येथे वृद्ध आदिवासी व महिला यांना मारहाण केल्याबद्दल दोन परप्रांतीय कामगारांना अटक करण्यात आली आहे.

काल रात्री खालापूर तालुक्यातील मौजे कलोते मोकाशी ठाकूरवाडी येथील एका वृद्ध कमलू शिंगवा यांना त्यांच्या मुलाच्या दुकाना शेजारी सुरज मिश्रा व मुन्ना मखिजा यांनी मारहाण करून जबर जखमी केले असून दुकानातील खुर्च्या, पिण्याच्या पाण्याचे भांडे व इतर साहित्य यांची मोडतोड केली असून, त्यांना जाब विचारण्यासाठी गेलेल्या महिला यांनाही जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करून पळून गेले,जखमी कमलू शिंगवा यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून डोक्याला मार असून टाके पडले आहेत.

याबाबत राम शिंगवा यांनी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून संपूर्ण ठाकूरवाडी खालापूर



पोलीस ठाण्यात हजर होऊन गुन्हेगार यांना तत्काळ अटक करण्याची मागणी केली.खालापूर पोलिसांनी सुरज मिश्रा व मुन्ना मखिजा या दोघांवर खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पुढील तपास उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल करीत आहेत.

# कोलमांडले गावाची डिजिटल झेप; महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनाचे आदर्श मॉडेल

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडले गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सर्वांगीण विकासाचे प्रभावी उदाहरण घालून दिले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, महिला सक्षमीकरणावर दिलेला भर, गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था आणि पर्यावरणपूरक उपक्रम यांच्या संगमातून गावाने प्रगतीचे नवे पर्व सुरू केले आहे.

गावातील डिजिटल ग्रामपंचायत कार्यालय हे या परिवर्तनाचे केंद्रबिंदू ठरले आहे. कार्यालयात संगणकीकृत नोंदी, ऑनलाइन सेवा, ई–गव्हर्नन्स प्रणाली आणि डिजिटल व्यवहार यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक झाले आहे. जन्म–मृत्यू दाखले, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला यांसारख्या सेवांसाठी ग्रामस्थांना आता तालुक्याच्या ठिकाणी वारंवार फेऱ्या माराव्या लागत नाहीत. घरबसल्या अर्ज प्रक्रिया आणि तत्काळ सेवा उपलब्ध झाल्याने वेळ आणि खर्चाची बचत होत आहे.

कोलमांडले गावातील महिला




स्वयंसहाय्यता गटांनी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. घरगुती उद्योग, खाद्यपदार्थ निर्मिती, हस्तकला आणि बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे. या उपक्रमांमुळे महिलांचे उत्पन्न वाढले असून त्यांच्या सामाजिक स्थानातही सकारात्मक बदल दिसून येत आहे. गावातील विकास प्रक्रियेत महिलांचा सक्रिय सहभाग हीच या गावाची खरी ताकद ठरत आहे.

गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि सुसज्ज अंगणवाडी केंद्र विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत. आधुनिक शिक्षणसाधने, डिजिटल शिक्षण पद्धती, स्वच्छ परिसर आणि गुणवत्तापूर्ण अध्यापन यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावला आहे. लहान मुलांच्या पोषण आणि आरोग्यावर विशेष भर देत अंगणवाडी केंद्रातून विविध उपक्रम राबवले जात आहेत.

गावात राबविण्यात आलेल्या परसबागा (किचन गार्डन) संकल्पनेमुळे प्रत्येक घरात सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला पिकवला जात आहे. यामुळे कुटुंबांच्या आरोग्यात सुधारणा झाली असून बाजारातील अवलंबित्व कमी झाले आहे. गाव परिसर हिरवागार ठेवण्यासाठी वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहिमाही सातत्याने राबविल्या जात आहेत.

कोलमांडले गावाने तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि पर्यावरण या चार स्तंभांवर विकासाचे मॉडेल उभे केले आहे. स्थानिक नेतृत्व, ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि शासनाच्या योजनांचा प्रभावी वापर यामुळे गावाने समृद्धीकडे भक्कम पाऊल टाकले आहे.हा विकासाचा आदर्श इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे

# सागरगडावर स्वच्छता अभियानासह शिवजयंती उत्साहात साजरी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

माफी असावी महाराज आम्ही तुमचे गड–किल्ले जपू शकलो नाही; मात्र यापुढे सर्वांनी मिळून जास्तीत जास्त प्रयत्न करू आणि सोशल मीडियामध्ये गुंतलेल्या पिढीपर्यंत तुमचा गौरवशाली इतिहास पोहोचवून गड–किल्ल्यांची आवड निर्माण करू, अशी शपथ अलिबागकर एक हात मदतीचा या ग्रुपतर्फे घेण्यात आली.

गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अलिबागकर (एक हात मदतीचा) ग्रुपतर्फे सागरगडावर शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शिवप्रेमी सदस्यांनी गडावर स्वच्छता अभियान राबवून ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संदेश दिला. शिवजयंती निमित्त सागरगड येथे हायकिंग व ट्रेकिंग उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी विविध गावांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावे वेगवेगळी असली तरी अलिबागकर या नात्याने सर्व सदस्य नियमितपणे एकत्र येऊन सामाजिक व ऐतिहासिक जतनाचे कार्य करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. प्रत्येक गावातून किमान एक सदस्य ग्रुपशी जोडला जावा व ही संख्या वाढवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही सदस्यांनी नमूद केले.

ग्रुपचे प्रमुख अमरेश ठाकूर, उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्वला चंदनशिव, माणुसकी प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान तसेच त्यांच्या सहकाऱ्यांकडून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार जपण्याबरोबरच गड–किल्ले, ऐतिहासिक स्मारके, पुरातत्व स्थळे व प्राचीन अवशेषांचे सर्वेक्षण, जतन आणि संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

यावेळी पुरातत्व विभागाने गड–किल्ले व ऐतिहासिक वारसा संवर्धनाकडे अधिक लक्ष देऊन आवश्यक कामे सुरू करावीत, अशी विनंती ग्रुपतर्फे करण्यात आली. तसेच या कार्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याची तयारी सदस्यांनी दर्शवली.

या उपक्रमासाठी उपस्थित सदस्य: मनोज माळी, डॉ. राजाराम हुलवान, अजित हरवडे, मिलिंद समेळ , प्रितेश पाटील, प्रथमेश घरत, उज्वला चंदनशिव, सुरेश साळुंखे , अमरेश ठाकूर , आसावरी राऊत, अभिषेक कोळी, साक्षी राऊत, अश्विन शिंदे व राऊत उपस्थित होते.

# चौक येथील ऐतिहासिक दगडी शाळा घेतली दत्तक

## नायब तहसीलदार राठोड यांची बांधिलकी



**चौक : प्रतिनिधी**

चौक येथील ऐतिहासिक दगडी शाळा, ही खालापूर निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दत्तक घेतली असून, आज शाळेला भेट देऊन शाळेची पाहणी केली. त्यांच्या सोबत चौक चे महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप उपस्थित होते.

रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या संकल्पनेतील शाळा दत्तक योजने अंतर्गत आज संपूर्ण रायगड जिल्ह्यात 'प्रेरणा दिन' साजरा केला जात आहे.याचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा चौक चे दत्तक पालकत्व निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या कडे असून त्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी ही नियोजित भेट होती.

यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी,हितचिंतक, ग्रामस्थ, आवर्जून उपस्थित होते.शाळेच्या भौतिक गरजांची पाहणी करत आवश्यक बाबींचा पाठपुरावा, चर्चा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आढावा घेण्यात आला. शाळेला आवश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी मदत मिळवण्या बाबत चर्चा झाली व नियोजन करण्यात आले. यावेळी शाळेची पाहणी करत नायब तहसीलदार सुधाकर राठो यांनी विद्यार्थ्यांबरोबर देखील संवाद साधला. यावेळी शाळेचे शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते

# ग्रामपंचायत तुराडे येथे जल अर्पण दिवस साजरा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारत सरकारची जल जीवन मिशन या योजने अंतर्गत रसायनी परिसरातील तुराडे येथे एक लक्ष क्षमतेची पाण्याच्या टाकीचे काम पुर्ण होऊन घरोघरी पाण्याचा पुरवठा आता सुरळीतपणे होतं असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत तुराडे येथे जल अर्पण दिवस चव्हाण शाखा अभियंता पाणीपुरवठा उपविभाग यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या वेळी सुंदर असे आयोजन ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात



आले होते. तांब्याच्या कलश्यात पाणी घेऊन त्याला आंब्यांची पाने सजवून सरपंच रंजना गायकवाड यांनी डोक्यावर घेऊन रॅली काढली होती. यावेळी उपसरपंच लीना मयूर ठाकूर, मालती वाघमारे,रिया प्रदीप माळी, पूजा चंद्रकांत भोईर, स्नेहा गायकर, यांनीही कलश मिरवणुकीत घेतला होता. यानंतर कार्यक्रमाच्या ठिकाणी सुंदर रांगोळी काढून कलश पाण्याने भरून जाके अर्पण करण्यात आले.

# दहावीच्या परीक्षेला शांततेत सुरुवात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील ५ केंद्रावर दहावीच्या परीक्षेला शांततेत सुरूवात झाली आहे.५ केंद्रावर बोर्डाच्या कर्मचारी सह पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

रोहा तालुक्यातील दहावीच्या ५ परीक्षा केंद्रावर सकाळी १० वाजल्यापासून विद्यार्थी व पालक जमा होत होते. साडेदहाच्या सुमारास विद्यार्थ्यांना परीक्षा हॉल कडे सोडण्यात आले. मेहेंदळे हायस्कूल येथे गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, प्राचार्य रमेश मोसे, केंद्र प्रमुख किशोर पाटील, सकाळ सत्र प्रमुख नारायण पानसरे आदींनी स्वागत केले.

रोहा तालुक्यात रोहा केंद्र ७०५, कोलाड केंद्र ६५२, नागोठणे केंद्र ४६७,चणेरा केंद्र १५२,सानेगांव केंद्र ११६ असे एकुण २०९२ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. १२ बारावीची सुद्धा परीक्षा चालू असून बारावीसाठी रोहा तालुक्यात रोहा केंद्र ४४६, कोलाड केंद्र ३५४, वरसगाव केंद्र ४९२, नागोठणे केंद्र ४४७ असे एकुण १७३९ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत.

या संपूर्ण परीक्षाची प्रक्रिया परिरक्षक तथा गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, उपपरिरक्षक किशोर पोळेकर, सहा परिरक्षक ललीत लेंडी, आणि विनोद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली चालु आहे.

# शिवजयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर

## अलिबागच्या महान येथे उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

महान तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे शिव समर्थ मित्र मंडळ यांच्या वतीने शिवजयंती उत्सव २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. या उत्सवानिमित्त उज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रामराज येथे दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





या शिबिरात नागरिकांची बीपी, पल्स, ईसीजी, ब्लड शुगर, डायबिटीस, संधिवात, खरुज तसेच इतर विविध आजारांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर गरजू रुग्णांना मोफत औषधोपचार देण्यात आले.शिबिरास गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त



प्रतिसाद लाभला. या प्रसंगी गावातील मान्यवर रोहन कांबळे, दीपक पाटील, विकी महाले, ऋतिक करंज, मिलिंद महाले उपस्थित होते.

तसेच उज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती उज्वला चंदनशिव, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व उज्वल भविष्य सामाजिक संस्था सचिव डॉ. राजाराम हुलवान तसेच डॉ. नितीन गांधी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.शिवजयंती निमित्त आयोजित या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होऊन सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम राबविण्यात आला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.


**कागदपत्रे हरविलेबाबत**

मी, **श्री. संदीप शांताराम म्हात्रे पत्ता : रा. घर क्र. १६०, मु.पोस्ट–नेरे, ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**

माझेकडून नेरे या परिसरात, दिनांक २/०२/२०२६ रोजी प्रवास करीत असताना खालील प्रकारची कागदपत्रे कोठेतरी पडून गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी तालुका पोलीस स्टेशन पनवेल येथे मिसिंग केस केली असून त्याचा मिसिंग रजि. नं. ००६५/२०२६ दिनांक. १६/०२/२०२६ रोजी नोंद केली आहे. त्याप्रकारचा त्यांचेकडून दाखला घेतला आहे.

**गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.**

१. शॉप क्र. ०१, महालक्ष्मी नगर, नेरे, ता. पनवेल
या शॉपचे मुळ कागदपत्रे.

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९७०२०७२५७५ वर संपर्क साधावा.

**दिनांक :– २०/०२/२०२६** **सही/–**

**श्री. संदीप शांताराम म्हात्रे**
पत्ता : रा. घर क्र. १६०, मु.पोस्ट–नेरे,
ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मल:निस्सारण विभाग प्रमुख, पनवेल महानगरपालिका, पनवेल. | ०१ पिंपळ, ०१ पाम/ताडी व ०१ जंगली अशी एकूण ०३ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील मलउदंचन केंद्र, सेक्टर–७, भारती विद्यापीठासमोर, बेलपाडा, खारघर, ता. पनवेल, जि.रायगड येथे ०३ झाडे हे मलउदंचन केंद्राच्या Renovation कामाच्या अंतर्गत नवीन Screen Chamber चे बांधकाम करणेस बाधित होत असल्याने, धोकादायक स्थितीत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/–**
उपायुक्त
तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.३५/४१/२०२६
दिनांक : २०/०२/२०२६

# पनवेल प्रभाग १८मधील वाहतूक, नागरी सुविधा, पाणीपुरवठा प्रश्न लागणार मार्गी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक १८मधील विविध नागरी समस्या व प्रलंबित कामांबाबत नगरसेविका ममता प्रितम म्हात्रे यांनी प्रत्यक्ष पाहणी दौरा करून आयुक्तांना लेखी निवेदन देत तातडीच्या कार्यवाहीची मागणी केली आहे.



गार्डन हॉटेल सिग्नल परिसर वाढत्या शहरी विकासामुळे अत्यंत महत्त्वाचे ठिकाण बनले आहे. हायवेला जोडणारा ठाणा नाका रस्ता अरुंद असल्याने अवजड वाहने तसेच एनएमएमटी बसेसना वळण घेताना अडचणी निर्माण होत असून वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व दुचाकीस्वारांना मनस्ताप सहन करावा लागतो. संभाव्य अपघात टाळण्यासाठी या ठिकाणी दोन्ही बाजूंनी नियोजनबद्ध पद्धतीने रस्ता रुंदीकरण करून सुरक्षित व सुलभ वाहतुकीची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रभाग १८मधील पाडा मोहल्ला व भुसार मोहल्ला परिसरात नालेसफाई, तुटलेली गटार दुरुस्ती, पेवर ब्लॉक बसवणे, आवश्यक त्या ठिकाणी काँक्रिटीकरण आदी कामे असून नागरिकांकडून त्याबद्दल तक्रार प्राप्त होत आहेत. याकूब बेग हायस्कूल ते कच्छी मोहल्ला दरम्यान नाला, स्वच्छ करून नव्याने बांधकाम करून आवश्यक त्या ठिकाणी स्लॅब करणे, अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेवर ब्लॉक/काँक्रिटीकरण, सार्वजनिक शौचालयाची ड्रेनेज लाईन दुरुस्ती, तुटलेली गटारे व चेंबर दुरुस्ती, संपूर्ण प्रभागातील नालेसफाई करण्यासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

**प्रितम म्हात्रे यांच्या सूचनेनुसार संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी दौरा मी केला असून अधिकाऱ्यांनी तक्रारी योग्य असल्याचे मान्य करून तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. प्रभाग १८मधील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेवर आणि दर्जेदार मिळणे ही माझी प्राथमिक जबाबदारी आहे. प्रत्येक काम तातडीने व पारदर्शक पद्धतीने पूर्ण व्हावे यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. नागरिकांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सोयीसाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.**

**–ममता प्रितम म्हात्रे, नगरसेविका, पनवेल मनपा**

महर्षी वाल्मिकी नगर येथे नगरसेविका ममता म्हात्रे यांनी पाणीपुरवठासंदर्भात पाहणी दौरा केला. यावेळी परिसरातील स्वच्छतेबाबतही आवश्यक सूचना देण्यात आल्या. या पाहणी दौऱ्यात महापालिकेच्या आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा व विद्युत विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

दौऱ्यादरम्यान नागरिकांकडून ठराविक वेळेत पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची तक्रार करण्यात आली. त्यावर तत्काळ संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या समक्ष पाणी सोडणाऱ्या लाईनमन यांना बोलावून तक्रारीचे निवारण करण्यात आले. यापुढे पाणीपुरवठा सांगितलेल्या वेळेत आणि योग्य दाबाने करण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश त्यांच्याकडून देण्यात आले.

## पनवेलच्या टपाल नाका चौकात वाहतूक कर्मचारी नेमण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या टपाल नाका चौकात (शनि मंदिर) वाहतूक कर्मचारी नेमण्याची शिवसेना नेते चंद्रशेखर सोमण यांनी मागणी केली असता या मागणीची तत्परतेने दखल घेत वाहतूक शाखेचे वपोनि औदुंबर पाटील यांनी तत्काळ एक अधिकारी व एक कर्मचारी सदर ठिकाणी नियुक्त करून प्रत्यक्ष कामाला सुरूवात केली आहे.

पनवेल शहरातील टपाल नाका परिसरामध्ये सायंकाळी ६ ते ९ या वेळेत प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. पनवेल रेल्वे स्टेशनकडून येणारे सर्व प्रवासी करंजाडे नोडमध्ये जाण्यासाठी मुख्यत्वेकरून याच रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषकरून मुस्लीम समाजाच्या पवित्र महिन्यातील रोजे सुरू झाले आहेत. आधीच वाहतूक कोंडीमुळे वर्दळ असणाऱ्या या परिसरात उपरोक्त कालावधीत वाहतूक कोंडीची समस्या अधिकच गंभीर होण्याची शक्यता आहे.

वाहतूक कोंडीमुळे प्रसंगी कायदा सुव्यवस्थेचा ही प्रश्न ऐरणीवर येऊ शकतो. तरी वरील सर्व बाबींचा विचार करून किमान पुढील एक महिना टपाल नाका व भाजी मार्केट (शिवाजी रोड) परिसरात आपले वाहतूक कर्मचारी प्राधान्याने



नेमणुकीस ठेवावेत ही महत्वाची सूचना चंद्रशेखर सोमण यांनी वाहतूक शाखेचे वपोनि औदुंबर पाटील तसेच पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्याकडे केली होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत या ठिकाणी तत्काळ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आल्याने चंद्रशेखर सोमण यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**पनवेल शहर वाहतूक शाखा व पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी तत्परतेने तक्रारीची दखल घेऊन संबंधित ठिकाणी अधिकारी, कर्मचारी उपस्थित केल्याने शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघणार आहे.**

**–चंद्रशेखर सोमण, शिवसेना नेते**

## नवी मुंबई महानगरपालिकेत सागर नाईक सभागृह नेते

**नवी मुंबई : बातमीदार**

काही दिवसांपूर्वी नवी मुंबई महापालिकेची महापौर व उपमहापौर पदाची विशेष सर्वसाधारण सभेत निवड झाली होती. शुक्रवारी सर्वसाधारण महासभा घेत सभागृह नेते व विरोधी पक्ष नेत्यांची निवड करण्यात आली.

सभागृह नेतेपदी भाजपचे गटनेते असलेले माजी महापौर सागर नाईक तर विरोधी पक्ष नेतेपदी शिवसेनेचे विजय चौगुले यांची अपेक्षेनुसार निवड करण्यात आली. दोन्ही पक्षांनी पीठासन अधिकारी असलेल्या महापौरांकडे बंद लिफफ्यात नावे दिली होती. त्यानुसार ही अधिकृत घोषणा करण्यात आली.

जवळपास सहा वर्षानंतर निवडणुका होऊन पालिकेचे सभागृह अस्तित्वात आले आहे. मुख्य म्हणजे २०१५ पासून पडद्याआडून पालिकेची सूत्र चालवणारे माजी महापौर सागर नाईक तब्बल १० वर्षांनी नगरसेवकपदी निवडून येत, पालिकेच्या सक्रीय राजकारणात परतले आहेत.

यावेळी सभागृ नेते सागर नाईक यांनी दिलेल्या संधीबद्दल पक्षाचे आभार मानले. सभागृहाचे कामकाज हा महापालिका अधिनियमानुसार चालवले जाईल. नियमाच्या बाहेर जाऊन कोणताही निर्णय घेतला जाणत नाही अशी ग्वाही दिली. विरोधकांनी केवळ विरोधासाठी विरोध न करता नियमांनुसार भूमिका मांडावी, असे आवाहन त्यांनी केले. वनमंत्री गणेश नाईक यांच्या दूरदृष्टीने शहराच्या विकासासाठी योगदान देण्याचा संकल्प त्यांनी केला.

## कामोठे, खारघरमध्ये मनपा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्यावतीने पालिका हद्दीतील अनधिकृत झोपड्या, शेड, स्टॉल्सवर आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी तोडक कारवाई करण्यात येत आहेत.



मंगळवारी प्रभाग समिती क कामोठे सेक्टर ३४ येथील वेलनेस फॉरेव्हर मेडिकल समोरील रस्त्यावर अनधिकृतरित्या बसलेल्या विक्रेत्यांवर सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने यांच्या देखरेखीखाली अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करण्यात आली.

दरम्यान, खारघरमधील कोपरा येथील अनधिकृत झोपडपट्टीवर तोडक कारवाई करण्यात आली. खारघरमधील बेलापूर रोड वरील अनधिकृत नीरा विक्रेत्यांवर तोडकर कारवाई करण्यात आली.

## मोहोपाडा येथे आज दिव्यांगांसाठी क्रिकेट स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कुलाबा दिव्यांग सोशियल फाउंडेशन इंडिया व कुलाबा दिव्यांग क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड, मुंबई, नवी मुंबई व ठाणे या चार दिव्यांग संघात शनिवारी (दि. २१) मोहोपाडा येथील एनआयएसएम सेबी मैदानावर दिव्यांग मैत्री चषक २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे आयोजन कुलाबा दिव्यांग सोशियल फाउंडेशन अध्यक्ष शशांक हिरवे, सचिव सुनील पाटील, खजिनदार अरुण घोडके, कार्याध्यक्ष तथा सहकार्य अपंग कल्याणकारी संस्थे सचिव शिवाजी पाटील, कल्पेश तवले, मंगेश पार्टे, नागनाथ घोडके, रूपेश पवार, रवी भोईर, यशवंत शिंदे, रमाकांत मांडे, चंद्रकांत पवार, विनायक अहेर, कमलाकर लबडे आणि स्वामीज्ञ फाउंडेशनने केले आहे.

## शिवरायांच्या पुस्तकावर मुलाखत

**नवी मुंबई :** शिवजयंतीनिमित्त नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई या संस्थेने सिवुड येथील म्हात्रे नर्सरीवर काशीनाथ मढवी लिखित जगातील सर्वोत्तम राजा छत्रपती शिवाजी या पुस्तकावर लेखक आपल्या भेटीला मुलाखत आयोजित केली होती त्यास उस्फूर्त



प्रतिसाद लाभला. नवरंग मंडळाचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे यांनी संस्थेचे विविध उपक्रम यांची माहिती दिली. उल्का सावंत या बालिकेने शिवगर्जना म्हटली, हरिश्चंद्र माळी यांनी शिवकाव्य सादर केले. घनश्याम परकाले यांनी लेखक काशीनाथ मढवी यांची मुलाखत घेतली. या कार्यक्रमात नाट्यकर्मी रवी वाडकर, लेखिका पाकिजा आत्तार, लेखक सर्जेराव कुईगुडे, डॉ. अविनाश पाटील यांनी आपले विचार मांडले. अनन्या साठे या कुमारीने शिव गर्जना सादर केली. विलास राजुरकर यांनी शिव गीत सादर केले. नवरंग. मंडळ सदस्य आणि साहित्य रसिक यांनी कार्यक्रम यशस्वी केला.

## निवडक

### वाशी येथे शिवजन्मोत्सव

**नवी मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने वाशी येथे जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता. सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी, फाटक्यांची आताशिबाजीने या सोहळ्यात महाराष्ट्राच्या मातीतील कलागुणांचे दर्शन घडले. यामध्ये शाहीर वैभव घरत यांनी सादरीकरण केलेल्या शिवचरित्र पोवाड्यांमुळे वातावरण शिवमय झाले होते. शिवरायांच्या पुतळ्याभोवती केलेली फुलांची सजावट आणि डोळे दिपवणारी विद्युत रोषणाई हे आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरले होते.

### उरण केगाव येथे शिवजयंती

**उरण :** तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीतील आवेडा



येथील स्टार किड्स वतीने सालाबादप्रमाणे यंदाही शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. स्टार किड्सच्या धनश्री अक्षय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी भाषण केले, नृत्य सादर केले. विविध चित्रकला काढून आनंद व्यक्त केला. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची लेझीम, ताशाच्या गजरात मोठ्या उत्साहात मिरवणूक काढली होती. महिला वर्गाचे भेट वस्तू, गुलाब पुष्प देवून सर्वांचे स्वागत करण्यात. त्याच प्रमाने ५० ग्रामस्थ उपस्थित होते. मुलांना खाऊ वाटण्यात आला. धनश्री अक्षय पाटील यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले.

### गोंधळी परिवाराचे सांत्वन

**उरण :** ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक व कवी धनंजय चिंतामण गोंधळी यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच, उरण तालुका



दैनिक पत्रकार संघाच्या पदाधिकारी व सदस्यांनी बुधवारी (दि.१८) रोजी धनंजय गोंधळी यांच्या चिरनेर कातळपाडा येथील निवासस्थानी गोंधळी कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. या वेळी उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष जगदीश तांडेल, सचिव मधुकर ठाकूर, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, माजी अध्यक्ष जिवन केणी, उपाध्यक्ष दिनेश पवार, माजी सचिव दत्तात्रेय म्हात्रे, सदस्य मनोज पाटील, पंकज ठाकूर तसेच अन्यजण उपस्थित होते.

## लिमये महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात



**कळंबोली : बातमीदार**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवराय यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला कळंबोलीतील शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयातील इतिहास विभागाने अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या सहकार्याने शिवजयंती निमित्त विशेष व्याख्यान व विविध स्पर्धांचे आयोजन केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी प्रमुख वक्ते म्हणून अभिषेक जयदेव ठाकूर (सदस्य – सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्तान, पुणे) उपस्थित होते. सह्याद्री प्रतिष्ठान या संस्थेशी झालेल्या सामंजस्य करारानुसार गड–किल्ल्यांचे संवर्धन या विषयावर त्यांनी प्रभावी व्याख्यान दिले. त्यांनी शिवकालीन किल्ल्यांचे ऐतिहासिक, स्थापत्यविषयक, लष्करी व सांस्कृतिक महत्त्व स्पष्ट करत तरुणांनी किल्ले संवर्धनासाठी स्वयंप्रेरणेने पुढे यावे, असे आवाहन केले. प्रमुख उपस्थितीत डॉ. विजय मोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रशासन व्यवस्थेचे व सुशासन तत्त्वांचे सविस्तर विवेचन केले. शिवकालीन राजकारभारातील लोकाभिमुखता, शिस्तबद्ध लष्कर, महसूल व्यवस्था व न्यायनिष्ठ धोरणे यांचे त्यांनी उदाहरणांसह विश्लेषण केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रिती महाजन होत्या. आयक्यूएसी समन्वयक व इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. बी.बी. जाधव यांनी प्रास्ताविकात शिवचरित्राचा महिमा सांगून आयोजित स्पर्धांचा उद्देश स्पष्ट केला. शिवगर्जना म्हणून आभार प्रदर्शन डॉ. स्वाती शिंदे यांनी केले. या निमित्त निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा तसेच राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक वैदेही आनंदा व्हनांगडे, द्वितीय क्रमांक हर्षदा विजय व्हनमाने, अनुष्का शरद खानावकर तृतीय नम्रता तात्यासाहेब हजारे, हर्षदा राजेंद्र कुवर तर वक्तृत्व स्पर्धात प्रथम क्रमांक हर्षदा व्हनमाने, द्वितीय क्रमांक नम्रता म्हात्रे, वेशभूषा स्पर्धा : प्रथम क्रमांक हर्षदा व्हनमाने, द्वितीय क्रमांक पायल चव्हाण, विकी सप्ते, तृतीय क्रमांक वैदेही व्हनांगडे, अजय बिराजदार यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे उडान फेस्टिवलमध्ये यश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाने मुंबई विद्यापीठाने एस आय इ एस महाविद्यालय नेरूळ येथे आयोजित केलेल्या उडान फेस्टिवलमध्ये (झोनल राऊंड) पथनाट्य स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकाविला आहे.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या पथनाट्य स्पर्धेमध्ये भाग घेऊन त्यांच्या सादरीकरण कौशल्याने तिसरा क्रमांक पटकाविला. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेऊन हे यश खेचून आणले आहे. आर्यन म्हसकर याने या स्पर्धे साठी लीडर म्हणून काम केले तसेच त्याचे इतर मित्र व मैत्रिणींनी त्याला या स्पर्धेसाठी साथ दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धांसाठी प्रा. महेश धायगुडे, समन्वयक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, प्रा. योगिता पाटील व प्रा. प्रमोद वाघे तसेच अध्ययन अध्यापन व विस्तार विभागातील इतर सर्व सदस्य यांचे विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, परेशशेठ ठाकूर कार्यकारी संचालक जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## एमआयटी विश्वशांती गुरुकुलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**पनवेल : वार्ताहर**

माईर्स एमआयटी पुणे संचालित विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये छत्रपती



शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका अंशू सक्सेना यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज, जिजामाता आणि मावळ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. या वेळी शिवरायांचे शौर्य, दूरदृष्टी आणि स्वराज्य स्थापनेच्या महान कार्यावर आधारित प्रभावी पोवाडा आणि नाटिका सादर करण्यात आली.

मुख्याध्यापिका अंशू सक्सेना यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करताना म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासातील आदर्श व्यक्तिमत्त्व नसून ते शौर्य, राष्ट्रप्रेम आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने शिवरायांचे विचार आचरणात आणण्याचा आणि उत्तम नागरिक बनण्याचा प्रयत्न केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

## बालाजी सिम्पनी सोसायटीत शिवरायांचा जयघोष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल (पूर्व) येथील बालाजी सिम्फनी सोसायटीमध्ये १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. अरबी समुद्रात उभारण्यात येणाऱ्या शिवाजी महाराजांच्या भव्य स्मारकाच्या प्रतिकृतीचे सादरीकरण हे यंदाच्या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. या संकल्पनेतून शिवरायांच्या शौर्य, स्वाभिमान आणि स्वराज्याच्या तेजाचा गौरव व्यक्त करण्यात आला.



उत्सवाची सुरुवात शिवभक्तिमय वातावरणात झाली. मध्यरात्री १२ वाजता बाल शिवबा राजेंचा पाळणा, आणि १९ फेब्रुवारी रोजी पारंपरिक साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, पालखी सोहळा जल्लोषात पार पडला. सायंकाळी संगीताच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत सहभागी झालेले युवक, पारंपरिक भगवा ड्रेस कोड परिधान केलेले शिवभक्त आणि दुचाकी रॅलीमुळे पनवेल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमादरम्यान शिवचरित्रावर आधारित दमदार पोवाड्याने वातावरण भारावून गेले. लाठी–काठीसारख्या शिवकालीन खेळांच्या थरारक सादरीकरणाने उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, बालाजी सिम्फनी सोसायटी चे सर्व पदाधिकारी, सभासद त्याचबरोबर चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे उपस्थित होत्या.

# श्रीवर्धन आगार समस्यांच्या विळख्यात

## ▮ वेळापत्रक कायमच कोलमडलेले ▮ खराब बसेसमुळे प्रवासी त्रस्त

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन परिवहन आगाराच्या समस्या दिवसेंदिवस वाढतच आहेत. आगारामध्ये नवीन गाड्या आलेल्या असल्या तरीसुद्धा स्थानिक वाहतुकीसाठी शिवशाही बसेस वापरल्या जात आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना विनाकारण जास्त भुर्दंड सहन करावा लागत आहे.

श्रीवर्धन आगार सुरू झाल्यापासून नियमितपणे सुटणारी श्रीवर्धन अलिबाग ही बस श्रीवर्धन आगाराकडून नेहमीच चालू बंद, चालू बंद करण्यात येत असते. वास्तविक पाहता अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे व श्रीवर्धन हे जिल्ह्याच्या एका कोपऱ्यात आहे त्यामुळे येथील प्रवाशांना दीडशे किलोमीटर अलिबागला जाण्यासाठी प्रवास करावा लागतो.

काही कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी यांची देखील अलिबागला नियमितपणे कामे असतात, परंतु अलिबाग गाडीचे वेळापत्रक कधी चालू कधी बंद अशा अवस्थेत असल्यामुळे नागरिकांची आयत्या



वेळेला पंचाईत होते. तसेच श्रीवर्धन सातारा ही नियमित चालणारी बस सुद्धा पुन्हा बंद करण्यात आली आहे. या फेरीला भारमान चांगले असूनसुद्धा श्रीवर्धन आगाराकडून का बंद करण्यात आली? याबाबत कोणताही खुलासा आगाराकडून करण्यात येत नाही.

श्रीवर्धन आगारामध्ये अहिल्यानगर, बीड, उस्मानाबाद व लातूर या चार जिल्ह्यातील चालक, वाहक व कर्मचारी जास्त प्रमाणात असल्यामुळे श्रीवर्धन ते लातूर व श्रीवर्धन ते बीड या फेऱ्या कधीही बंद न करता नियमितपणे चालवल्या जातात. या फेऱ्यांना भारमान नसतानासुद्धा केवळ आपल्या कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी म्हणून ह्या फेऱ्या सुरू असतात.

श्रीवर्धनच्या प्रवाशांची ठाम मागणी आहे की, लातूर, बीड गाड्या बंद करून फक्त श्रीवर्धन पुणे हीच बस दिवसातून दोन ते तीन वेळा सोडावी. त्याचप्रमाणे श्रीवर्धन सातारा ही फेरी नियमित सुरू करावी व स्थानिक फेऱ्यांसाठी शिवशाहीचा वापर न करता लाल परीचाच वापर व्हावा, अशी मागणी प्रवासी वर्गा मधून केली जात आहे.

**व्यवस्थापनाने लक्ष देण्याची मागणी**

अनेक वेळा लातूर श्रीवर्धन पुणे या बसेस संध्याकाळी आठच्या दरम्यान श्रीवर्धनमध्ये पोहोचतात, परंतु त्यांना गावातून राऊंड असून सुद्धा चालक गावामध्ये गाडी आणण्यास नकार देतात. त्यामुळे प्रवाशांना श्रीवर्धन स्थानकातच उतरावे लागते. तेथून ७० रुपयांपासून १०० ते १५० रुपये पर्यंत रिक्षासाठी विनाकारण खर्च करावा लागतो. तरी आगार व्यवस्थापनाने या सर्व बाबींचा विचार करावा, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

# नागोठणे रिलायन्स येथील प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला यश

### मंत्री उदय सामंत, भरत गोगावलेंची मंत्रालयातील बैठकीत यशस्वी मध्यस्थी; तीन महिन्यांनी आंदोलन स्थगित



**पाली : प्रतिनिधी**

भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था-नागोठणे यांच्या माध्यमातून स्थानिक भूमिपुत्रांना रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे या कंपनी मध्ये कायमस्वरूपी नोकरी मिळावी या मागणीसह आझाद मैदानावर सर्व प्रकल्पग्रस्त सलग तीन महिन्यांपासून उपोषणाला बसले होते. रिलायन्स नागोठणे प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याला मोठे यश आल्याचे चित्र दिसून येत आहे.

मंत्री उदय सामंत, मंत्री भरत गोगावलेंनी मंत्रालयातील बैठकीत यशस्वी मध्यस्थी केली असून ३२४ प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्र धारक यांना रिलायन्स कंपनी पॅरोलवर नोकरीत सामावून घेणार असल्याचे निश्चित झाल्याने तीन महिने सुरू असलेले आझाद मैदानावरील आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले असल्याची माहिती भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था-नागोठणेचे अध्यक्ष गंगाराम मिनमीने यांनी दिली.

पूर्वीची आयपीसीएल व आत्ताची रिलायन्स नागोठणे कंपनीत प्रमाणपत्र धारक प्रकल्पग्रस्त यांचा न्यायासाठी प्रदीर्घ लढा सुरू आहे. प्रकल्पात कायम स्वरूपी नोकरीसाठी स्थानिक प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी कठोर भूमिका घेत जोमाने आंदोलन सुरू ठेवले होते. जो पर्यंत कायमस्वरूपी नोकरीचे कॉल लेटर रिलायन्स नागोठणे कंपनी देत नाही तो पर्यंत आम्ही आझाद मैदानावर सर्व प्रकल्पग्रस्त आमरण उपोषणालाला बसून राहणार, अशी आक्रमक भूमिका प्रमाणपत्र धारक प्रकल्पग्रस्तांनी घेतलेली होती. भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थाची नुकतीच मंत्रालय मुंबई येथे निर्णायक बैठक झाली. ही बैठक राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीला फलोत्पादन व रोजगार हमीमंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे तसेच रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे अध्यक्ष शशांक गोयल, गौतम मुखर्जी, विहान करानी, साहिल शेख, रमेश धनावडे, चेतन वाळंज, तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी (रायगड), उद्योग-१० कक्षाधिकारी, प्रधान सचिव महाराष्ट्र शासन, उप सचिव महाराष्ट्र राज्य, व उप जिल्हाधिकारी रायगड, एमआयडीसीचे श्री. चव्हाण तसेच भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थाचे अध्यक्ष गंगाराम मिणमिणे, उपाध्यक्ष रोशन जांबेकर, सचिव राकेश जवके, व पदाधिकारी आणि कमिटी व संस्थेचे वकील संदेश मोरे व त्यांचे दोन सहकारी वकील, तसेच जिल्हा परिषद सदस्य सुमित काते उपस्थित होते.

या बैठकीत प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर ३२४ प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्र धारक यांना रिलायन्स कंपनी पॅरोलवर नोकरीमध्ये सामावून घेण्याचा उद्योग मंत्री उदय सामंत यांनी धोरणात्मक निर्णय घेतला व चर्चेत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. रिलायन्स नागोठणे कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांनी यावर सहमती दर्शविली असल्याचे गंगाराम मिनमीने यांनी सांगितले. प्रकल्प ग्रस्तांच्या नोकऱ्या संदर्भात निर्णायक व सकारात्मक निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

# कडाव येथे आरोग्य शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षक स्व. राजेंद्र आढाव यांच्या स्मृती दिनानिमित्त कडाव येथे येथे आरोग्य शिबिर तसेच आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते.

यावेळी पंचायत समितीच्या सदस्या सुषमा पवाळी, शिवसेना शिंदे गटाचे तालुका प्रमुख सुदाम पवाळी, आरपीआय आठवले पक्षाचे तालुका अध्यक्ष गायकवाड, किशोर जाधव, जयेश शिंदे, सुहास आढाव, प्रभाकर गायकवाड, बौद्धाचार्य उदय आढाव आदी उपस्थित होते.

जीवक आयुर्वेद रुग्णालय आणि रायगड हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिर घेण्यात आले. रुग्णांची तपासणी डॉ. अशोक लोंढे आणि डॉ. रुपाली गायकवाड व आरोग्य पथकाने केली. शिबिराचे नियोजन योगेश घाणेकर यांनी केले असून त्यांना अशोका इंटरप्रायझेसचे सहकार्य लाभले. यावेळी असंख्य रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आणि उपचार करून घेतले.



# लोहोप येथे शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर







**मोहोपाडा : प्रतिनिधी**

हिंदूंचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने प्रथम त्यांस पुष्पहार अर्पण व शिव गर्जना करून या रक्तदान शिबिराची सुरुवात करण्यात आली. रसायनी पाताळगंगा परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथे एम.जी.एम. कामोठे येथील हॉस्पिटलचा तज्ञ स्टाफ उपस्थित होते.

यावेळी या परिसरातील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आशावर्कर तसेच वैद्यकीय कर्मचारी यांनी रक्तदान केले. सर्वात मोठे दान म्हणून रक्तदान यांस संबोधले जाते. आपण ते निर्माण करू शकत नाही. यामुळे, आजच्या तरुण वर्गास यांचे महत्व समजले असून, रक्तदान करण्यासाठी पुढे सरसावत आहे. आपण सर्व काही निर्माण करू शकतो, मात्र रक्त निर्माण करू शकत नाही हे शाश्वत आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने रक्तदान शिबिराचा कार्यक्रमात हाती घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी वासांबे सरपंच उमा मुंढे, विलास पाटील, डॉ. गुड हेल्थ डॉ. उलचिल मॅडम, समाजसेवक अरविंद पाटील, अतुल मालकर, महिला बचत गट अध्यक्ष कमल जाधव, वैद्यकीय अधिकारी मंगेश देशमुख, समुदाय आरोग्य अधिकारी नयन परब, आरोग्य सहायक गजानन बडदडे व धर्मा भस्मा, आरोग्य सहायिका मीना खरात, फार्मेसी अधिकारी सोनाली गाढे, प्रयोगशाळा अधिकारी समीकेश पाखरे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप अंतर्गत आरोग्य सेवक सेविका, इतर कर्मचारी व आशावर्कर व कर्मचारी उपस्थित होते.

## निवडक



### नागाव येथे शिवजयंती उत्सव

**रेवदंडा :** नागाव येथे शिवजयंती उत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला, या निमित्त नागाव रिक्षा चालक व मालक संघटनेचे वतीने महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. नागाव मुख्यः रस्तालगतच्या शिवाजी महाराज पुतळा प्रसिध्दीस आहे, या ठिकाणी शिवजयंती उत्सव मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. या शिवजयंती उत्सव व महापुजेचे निमित्ताने नव्यानेच निवडून गेलेले रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ.सचिन राउळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

### धाटाव गावात शिवजयंती साजरी

**धाटाव :** सालाबादप्रमाणे यावर्षीही धाटाव गावात सोनारसिद्ध ग्रामस्थ, क्रीडा व महिला मंडळ यांच्या वतीने शिवजयंती उत्सव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. किल्ले रायगड येथून आणलेली शिवज्योत धाटाव गावात आगमन झाल्यानंतर तिचे पूजन ऋतिक जाधव व काश्मिरी जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोहा तालुका राष्ट्रवादीचे सरचिटणीस तुकाराम भोकटे, महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे उपजिल्हाध्यक्ष मुकेश भोकटे, धाटाव गावचे माजी अध्यक्ष चंद्रकांत मालुसरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा कार्यकर्ते राज रविंद्र रटाटे तसेच नरेश म्हसकर, मिथुन मालुसरे, योगेश म्हसकर, ज्ञानेश्वर जाधव, चिंतामणी रटाटे, दीपक पवार, नितेश जाधव, शुभम मोरे आदी उपस्थित होते.

### पोलादपूर येथे शाळेत शिवजयंती

**पोलादपूर :** शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित पोलादपूर येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साह व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.



शिवज्योतीचे स्वागत शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे यांनी केले. या वेळी डॉ. प्रभाकर गावंड, रचित शिव, आरती दीक्षा रिंगे, प्रणाली साळुंखे, विनिता चिकणे आणि अभंग मिस्त्री या विद्यार्थ्यांनी सादर केली. पंढरीनाथ साळुंखे यांचे व्याख्यान झाले.

# आंतरराष्ट्रीय रंगमंचावर शरण्या वाघमोडेची कामगिरी



**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथील इयत्ता पाचवीतील कु. शरण्या वाघमोडे हिने जानेवारी २०२६ मध्ये आयोजित ऑनलाईन इंटरनॅशनल परफॉर्मिंग आर्ट्स कॉन्टेस्ट ॲण्ड फेस्टिव्हलमध्ये प्रथम क्रमांक पटकावून शाळेचा तसेच परिसराचा मान उंचावला आहे.

नागपूर येथील अखिल नटराजम् आंतर सांस्कृतिक संघ पॅरिस, फ्रान्स मान्यताप्राप्त यांच्या माध्यमातून झालेल्या या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत शरण्याने नृत्य, नाटिका याचे उत्कृष्ट सादरीकरण, शिस्तबद्धता आणि सर्जनशील अभिव्यक्तीच्या जोरावर हा मानाचा बहुमान मिळवला. तिच्या या यशामुळे जिंदल विद्या मंदिर, साळावला आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव प्राप्त झाला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी शरण्याचे अभिनंदन करून तिच्या जिद्द, परिश्रम आणि चिकाटीचे कौतुक केले. तिने कलाक्षेत्रात सातत्याने प्रगती करत इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# रागयड जिल्हा परिषदेचा दिव्यांग मुलांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम

### २०२५-२६ वर्षात १४४ मुलांना विमा कवच

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील दिव्यांग मुलांच्या आरोग्य उपचाराच्या मदतीसाठी रागयड जिल्हा परिषद नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. यामध्ये जिल्ह्यातील ऑटिझम, सेरेबल पॅल्सी, बौद्धिक अपंगत्व आणि बहुविकलांगता या प्रवर्गातील मुलांसाठी दिव्यांग कल्याणच्या पाच टक्के निधीमधून निरामय आरोग्य विमा काढण्यासाठी अनुदान देण्यात येते. त्यानुसार २०२५-२६ या वर्षांत १४४ मुलांसाठी निरामय आरोग्य विमा काढण्यासाठी अनुदान देण्यात आले आहे.





या अनुदानाचे पत्र प्रातिनिधिक स्वरूपात नऊ मुलांना बुधवारी (दि. १८) मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते अलिबाग येथे वाटप करण्यात आले. सन २०२४-२५मध्ये १०५ लाभार्थ्यांना हे अनुदान देण्यात आले होते.

राष्ट्रीय न्यास, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण विभाग भारत सरकार यांनी ऑटिझम, सेरेब्रल पॅल्सी, बौद्धिक अपंगत्व आणि बहुविकलांगता असलेल्या व्यक्तींसाठी सुरू केलेली निरामय आरोग्य विमा योजना वार्षिक एक लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य कव्हर देते. या योजनेचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मिळवून देणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे हा आहे. या योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा परिषद कार्यालयात संपर्क साधून नावनोंदणी करता येते.

अनेक वेळा दिव्यांग व्यक्तींना अथवा दिव्यांग मुलांच्या पालकांना विमा योजनेसाठी रक्कम भरणे शक्य नसते. त्यामुळे रागयड जिल्हा परिषदेने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहे. वाटप कार्यक्रमासाठी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे सहाय्यक सल्लागार साईनाथ पवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या योजनेसाठी लाभार्थ्यांकडे युडीआयडी कार्ड, आधारकार्ड, बँक खाते असणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ देशभरातील कोणत्याही प्रकारच्या रूग्णालयात घेता येतो.

# माथेरानमध्ये पहिल्यांदाच महिला पोलीस निरीक्षक

**माथेरान : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा पोलीस दलात रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी काही फेरबदल केले आहेत.यामुळे काही पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान पोलीस ठाणे येथे पहिल्यांदा महिला पोलीस निरीक्षक म्हणून सरिता मुसळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माथेरान पोलीस ठाण्यात अनिल सोनोने हे कार्यरत होते. त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने याठिकाणी येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून सरिता मुसळे यांची नियुक्ती केली आहे.माथेरान मध्ये पहिल्यांदाच महिला पोलीस अधिकारी रुजू झाल्या आहेत.त्यांनी माथेरान मध्ये दाखल होत आपला पदभारदेखील स्वीकारला असून येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांनी येथील कामाची सगळी सूत्रे त्यांच्या हातात देत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

सरिता मुसळे या रायगड जिल्ह्यातील कोलाड येथील राहणाऱ्या असून २०१२ साली पोलीस दलात दाखल झालेल्या सरिता मुसळे यांनी मुंबई, नवी मुंबई, पालघर, अलिबाग अश्या व्यस्त असलेल्या पोलीस ठाण्यात काम केलेले आहे. प्रभारी अधिकारी म्हणून माथेरान शहरात त्यांची ही पहिली नियुक्ती आहे.

# गावठी वालाच्या शेंगा तयार : श्रीवर्धन परिसरात पोपटीला सुरुवात

**श्रीवर्धन : बातमीदार**

कोकणातील विशेषतः रायगड जिल्ह्यामध्येच पोपटी लावण्याची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. आपल्या शेतात जेव्हा गावठी वालाच्या शेंगा तयार होतात. त्या वेळेलाच पोपटी बनवून खाण्याचा आनंद लुटण्यात मजा येते. श्रीवर्धन परिसरात सध्या घरगुती पोपटी लावून खाण्याचा आनंद कौटुंबिक स्तरावरती घेतला जात आहे. तर काही तरुण मंडळी पार्टी करताना खूप मोठ्या प्रमाणावर पोपटी शेतामध्ये किंवा एखाद्या फार्म हाऊस मध्ये लावतात.

त्या पोपटीमध्ये चिकन, अंडी, बटाटे, मच्छीचा तुकड्या इत्यादी पदार्थ टाकून देखील पोपटी लावण्यात येते. पोपटीमध्ये चिकन किंवा मच्छीच्या तुकड्या टाकताना चिकनला किंवा मच्छीच्या तुकड्यांना मसाला लावून केळीचे पान आगी वरती पोळून



घेऊन त्याच्या पुड्या बांधल्या जातात व त्या वालाच्या शेंगांच्या मध्ये मडक्यामध्ये टाकून त्याची पोपटी लावली जाते. पोपटी लावताना वालाच्या शेंगा बरोबरच ओवा, मीठ इत्यादी पदार्थ त्यामध्ये टाकले जातात. त्यामुळे केवळ वाफेवरती शिजलेल्या सर्व पदार्थांना अतिशय चांगल्या प्रकारची चव येते.

सध्या मडक्यांचे भाव देखील खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत, परंतु खवय्यांच्या आनंदाला वाढलेल्या किमतीची देखील परवा नसते. महागडे मडके आणून पोपटी लावून खाण्याचा आनंद हा वेगळाच असतो. पोपटी लावताना मडक्यामध्ये भांबुर्डी चा पाला खूप मोठ्या प्रमाणावर टाकावा लागतो. भांबुर्डीचा पाला, ओवा व मीठ याचा स्वाद वालाच्या शेंगा व त्यामध्ये टाकलेल्या पदार्थांना येतो. त्यामुळेच पोपटीला खऱ्या अर्थाने चव येते. वालाच्या शेंगा मिळायला आत्ताच सुरुवात झाली आहे. येत्या पुढील काही दिवसांमध्ये पोपट्यांचा आनंद घेताना अनेक जण पाहायला मिळतील.


















उलवे नोड : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून उलवे नोडमध्ये भव्य उत्सवाचे आयोजन गुरुवारी करण्यात आले होते. या उत्सवाचे मुख्य आकर्षण रामशेठ ठाकूर मैदान येथे द फोक आख्यान अंतर्गत झालेला महाराष्ट्राचा शाहिरी बाणा हा विशेष कार्यक्रम ठरला. सुप्रसिद्ध शाहीर चंद्रकांत माने आणि शाहिरा ऋतुजा माने यांनी आपल्या खणखणीत आवाजात आणि प्रभावी सादरीकरणातून शिवचरित्र आणि मराठी संस्कृतीचे दर्शन घडवले.





उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्ताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रामशेठ ठाकूर मैदानावर आयोजित जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे शुक्रवारी उद्घाटन झाले.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com